Deccan Education Society, Pune

# 125 Years in Pursuit of Excellence

A Photo - Journey 1884 - 2009

डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे

# गुणवत्तेच्या ध्यासाची १२५ वर्षे

एक चित्रमय वाटचाल १८८४ - २००९

"We have undertaken this work with the firmest conviction and belief that of all agents of human civilization, education is the only one that brings about the material, moral and religious regeneration of fallen countries and raises them up to the level of the most advanced nations by slow and peaceful revolutions; and again, in order that education may produce the highest beneficial results which all righteous of whatever country or belief agree in ascribing to it, it is absolutely necessary that it should be in the hands of the people themselves, its scope ought to be free and in no way must it work against the grain."

From speech by
**Prof. V. S. Apte**
on 24th October 1884.

'' मनुष्य संस्कृतीच्या साऱ्या विकासघटकातील शिक्षण हा असा एकमात्र घटक आहे की जो पतित राष्ट्रांचे ऐहिक, नैतिक आणि धार्मिक पुनरुत्थान घडवून आणू शकतो आणि अशा राष्ट्रांना सहजपणे अत्यंत प्रगत राष्ट्रांच्या स्तरावर नेऊन ठेवतो, अशा निश्चित धारणेने आणि विश्वासाने आम्ही हे काम हाती घेतले आहे. शिवाय, शिक्षणातून अत्यंत फलदायी अशा प्रकारची निष्पत्ती होण्यासाठी शिक्षण हे लोकांच्याच हाती असायला हवे, ते मुक्त हवे आणि ते कोणत्याही परिस्थितीत मूळ गाभ्याच्या विरोधात जाता कामा नये.''

**प्रा. वा. शि. आपटे**
यांनी २४ ऑक्टोबर १८८४ रोजी केलेल्या भाषणातून

## Acknowledgement

At the outset I express my profound and heartfelt sense of gratitude towards Honourable President of the Society Chhatrapati Shri Shahu Maharaj for sparing his valuable time and for providing photographs from his personal collection. In the following few lines I attempt to express my grateful acknowledgement,

towards Principal Dr. S. V. Bokil, Dr. Ajit Patwardhan(Chairman of Council of the Society), Dr. U. N. Limaye(Retired Life Member), Shri Vasantrao Kanitkar(Ex-Chairman of the Council), Shri Prashant Gokhale(Council Member), and Dr. Jayashri Sathe(Editor and Coordinator of Department of Sanskrit and Lexicography, Deccan College) for providing key information and vital advice;

towards Shri V. P. Gadgil, Principal Dr. S. V. Bokil, Dr. Dilip Joag, Shri Vasantrao Kanitkar, Shri M. G. Aslekar for providing photographs from their personal collections;

towards my life member colleagues Dr. S. N. Kanetkar, Dr. H. M. Pednekar, Shri R. J. Patil, Dr. Savita Kelkar, Dr. Jagdish Lanjekar, and teacher colleagues Dr. Rajendra Mahamuni, Dr. Prasad Joshi and our Estate Engineer Shri Neeraj Purnapatre, for putting all their resources at my disposal, and towards Council Member Sou. Veenita Lele, Head Mistress of "Ahilyadevi" Tilottama Raddi, Sou. Amruta Lele, Snehal Kulkarni, Varsha Ganu, Savita Dani, for their help at the critical hour while racing for the deadline;

towards Shri Sandesh Bhandare, Shri Milind Wadekar, Shri P. N. Date, students of Photography of Fergusson College and all other unknown photographers who photographed the events,

all those who preserved the photographs;

towards Smt. Suvarna Vaidya, Shri Rohit Sonsale, Smt. Vaishali Kulkarni, Smt. Sampada Balpathak, Smt. Manisha Bhagwat, Shri Sanjay Dive, Shri Ravindra Joshi, Shri Sukhdev Parde for providing the Marathi Typing support; towards all the colleagues in the schools, colleges and offices of the Society, notably DES Central office, for providing various resource material; and again towards Shri Sandesh Bhandare and his colleagues Jitendra Kalaskar, Rajendra Girme, Babu Sonawane for the design work. Their credit is manifold this cryptic expression of gratitude, possible within the limitation of the pages. Without their contribution this publication would have been impossible.

**- Editor -**

## ऋणनिर्देश

सुरूवातीसच आपल्या संस्थेच्या अध्यक्ष, छत्रपती श्री. शाहू महाराजांनी दिलेला अमूल्य वेळ आणि त्यांच्या व्यक्तिगत संग्रहातून दिलेल्या छायाचित्रांसाठी मी माझी कृतज्ञता व्यक्त करतो. या ठिकाणी लिहीत असलेल्या थोड्या ओळीतून माझ्या कृतज्ञतेच्या भावना प्रगट करण्याचा प्रयत्न करीत आहे.

ही कृतज्ञता प्राचार्य श्री. श्री. व्यं. बोकील, संस्थेच्या परिषदेचे अध्यक्ष डॉ. अजित पटवर्धन, निवृत्त आजीव सदस्य डॉ. उ. नृ. लिमये, संस्थेच्या परिषदेचे माजी अध्यक्ष श्री. वसंतराव कानिटकर, संस्थेच्या परिषदेचे सदस्य श्री. प्रशांत गोखले आणि डेक्कन कॉलेजच्या संस्कृत आणि कोषशास्त्र विभागाच्या संपादक आणि समन्वयक डॉ. जयश्री साठे यांनी दिलेल्या माहिती आणि सल्ल्यासाठी आहे.

श्री. वि. पां. गाडगीळ, प्राचार्य डॉ. श्री. व्यं. बोकील, डॉ. दिलीप जोग, श्री. वसंतराव कानिटकर, श्री. मा. गो. असलेकर यांनी त्यांच्या व्यक्तिगत संग्रहातून दिलेल्या छायाचित्रांसाठी आहे.

माझे आजीव सदस्य सहकारी डॉ. श्री. नी. कानेटकर, डॉ. हे. मं. पेडणेकर, श्री. रा. जं. पाटील, डॉ. सविता केळकर, शिक्षक सहकारी डॉ. राजेंद्र महामुनी, डॉ. प्रसाद जोशी आणि आमचे स्थापत्य अभियंता श्री. नीरज पूर्णपात्रे यांनी त्यांचे सर्व मदतीचे हात माझ्या दिमतीला दिले यासाठी आहे.

आणि अत्यंत निर्णायक क्षणी वेळेशी शर्यत करताना मदत देणा-या परिषद सदस्या सौ. विनीता लेले आणि अहिल्यादेवीच्या मुख्याध्यापिका सौ. तिलोत्तमा रेड्डी, सौ. अमृता लेले, स्नेहल कुलकर्णी, वर्षा गानू, सविता दाणी  यांच्या प्रती आहे.

श्री. संदेश भंडारे, श्री. मिलींद वाडेकर श्री. पां. नी. दाते, फर्ग्युसन महाविद्यालयाच्या छायाचित्रण विभागाचे विद्यार्थी आणि सर्व अन्य अज्ञात छायाचित्रकार ज्यांनी वेळोवेळी  संस्थेसाठी छायाचित्रण केले  आणि ज्यांनी या छायाचित्रांचे जतन केले त्या सा-यांप्रतीही आहे.

सौ. सुवर्णा वैद्य, श्री. रोहित सोनसळे, सौ. वैशाली कुलकर्णी, सौ. संपदा बालपाठक, सौ. मनीषा भागवत, श्री. संजय दिवे, श्री. रवींद्र जोशी, श्री. सुखदेव पारडे यांच्या मराठी टंकलेखनासाठी आहे.

शाळा महाविद्यालयातील आणि संस्था कार्यालयातील सहकारी, ज्यांनी उपयुक्त माहिती कागदपत्रे छायाचित्रे पुरवली यांच्याप्रती आहे. अंकुश चौगुले, अरूण उतेकर यांच्या काम चालू असताना पुरवलेल्या सर्व मदतीसाठी आहे.

आरेखन करणारे श्री. संदेश भंडारे व त्यांचे सहकारी जितेंद्र कळसकर, राजेंद्र गिरमे, बाबू सोनवणे यांचे प्रति आहे.

उपलब्ध पानांच्या मर्यादेत मांडलेल्या या त्रोटक ऋणनिर्देशाच्या कितीतरी पटीने अधिक या सर्वांचे श्रेय आहे. त्यांच्या सहकार्याशिवाय हे प्रकाशन अशक्य ठरले असते.

**– संपादक –**

## Foreword

The Deccan Education Society on 24th October 2009,
and the Fergusson College on 2nd Jan 2010,
completed 125 years of their glorious existence.
The entire period was of tireless efforts by our great founders and their worthy successors. Owing to their vision and the ethos they have bequeathed upon the present generation, it is possible to face the challenges of the day and to prepare for the challenges in the times to come. To find and follow their footsteps the Society has decided to compile the history of DES from 1960 till this date. The task is enormous and the work has begun.
As was desired by the members of the Society and well-wishers, the Deccan Education Society is coming out with this commemorative publication at the time of the concluding ceremony of the Post Centennial Silver Jubilee. It is a matter of pride as the release is to take place at the hands of our most honourable
**President Smt. Pratibha Devisingh Patil.**
The team of teaching and non teaching staff and life members was led by my colleague Prof. Anand Bhide, who was instrumental in inception and execution of the idea of this issue. He worked under the general guidance of the Governing Body. I am particularly thankful to the Hon'ble Chairman Dr. Ajit Patwardhan and Vice Chairman Shri Vikas Kakatkar for their timely and valuable inputs and unflinching support throughout.
Thanks also to all those who contributed and participated in the work involved.

**Shrikrishna Kanetkar**
Secretary,
Deccan Education Society, Pune
19-04-2010

## प्रस्तावना

डेक्कन एज्युकेशन सोसायटीने २४ ऑक्टोबर, २००९ रोजी,
तसेच फर्ग्युसन महाविद्यालयाने २ जानेवारी, २०१० रोजी
आपली वैभवशाली १२५ वर्षे पूर्ण केली.
हा काळ आपल्या संस्थापकांच्या आणि पूर्वसुरींच्या अथक परिश्रमांचा होता.
त्यांच्या दूरदृष्टीमुळे समोर असलेली आणि आगामी काळात येणारी
आव्हाने पेलण्याचे बळ संस्थेतील कार्यरत नव्या पिढीला मिळाले आहे.
त्यांनी केलेल्या कार्याचा मागोवा घेण्यासाठी संस्थेने तिसऱ्या टप्प्यातील
१९६० ते आज अखेरचा इतिहास संकलित करून प्रकाशित करण्याच्या कार्याला सुरवात
केलेली आहे. संस्थेचे सदस्य आणि हितचिंतक यांच्या अपेक्षेप्रमाणे शतकोत्तर रौप्य
महोत्सवाच्या समापन समारंभाच्या निमित्ताने एक स्मरणिका
डेक्कन एज्युकेशन सोसायटी सादर करत आहे.
संस्थेच्या सद्भाग्याने या स्मरणिकेचे प्रकाशन भारताच्या माननीय
**राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा देवीसिंह पाटील**
यांच्या हस्ते होत आहे याचा विशेष आनंद आहे. स्मरणिकेचे काम शिक्षक-शिक्षकेतर
आणि आजीव सदस्यांनी प्रा. आनंद भिडे ह्यांच्या नेतृत्वाखाली केले आहे.
मूळ संकल्पना व ती प्रत्यक्षात उतरवण्याचे काम प्रा. भिडे यांनी नियामक मंडळाचे
अध्यक्ष डॉ. अजित पटवर्धन, उपाध्यक्ष श्री. विकास काकतकर व अन्य सदस्यांच्या
वेळोवेळी मिळालेल्या मार्गदर्शनामुळे व सहकार्यामुळे यथोचित पार पाडले आहे.
मी या सर्वांचा तसेच या स्मरणिकेमध्ये ज्यांचे योगदान झाले
त्यांचा ऋणी आहे.

डॉ. श्री. नी. कानेटकर
कार्यवाह,
डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे.
१९-०४-२०१०

"I am extremely glad
to receive the opportunity to be present for the
concluding function on completion of
125 years of this esteemed Society of
historic importance.
The pleasant memory, that my father and uncle
have studied here, makes me feel happy.
My heartiest best wishes to the Society
to keep on making progress while
preserving its culture,
high aims and ideals!
Thanks!"

Pratibha Patil
19/04/2010





ऐतिहासिक महत्व असलेल्या या नामांकित संस्थेच्या
१२५ वर्ष पूर्ण होत असलेल्या या सांगता समारंभास
उपस्थित राहण्याची संधी मला मिळाली याचा मनस्वी
आनंद आहे. माझ्या वडिलांनी व काकांनी इथे शिक्षण
घेतले होते ही एक सुखद स्मृती, हर्षित करणारी
आहे. संस्कृतीचे व उच्च ध्येय व आदर्शांची
जपणूक करीत ही संस्था प्रगती करीत राहो ही
हार्दिक शुभेच्छा! धन्यवाद!

प्रतिभा पाटिल

Pratibha Patil

19/04/2010

On the occasion of the concluding ceremony of the Post-Centennial Silver Jubilee of the Society and the Fergusson College a Kadamb tree was planted at the auspicious hands of The Hon'ble President Smt Pratibha Devisingh Patil on Wednesday, the 19th April 2010.



बुधवार दिनांक १९ एप्रिल २०१० रोजी डेक्कन एज्युकेशन सोसायटी व फर्ग्युसन महाविद्यालयाच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवाच्या सांगता समारंभाच्या प्रसंगी माननीय राष्ट्रपती प्रतिभा देवीसिंह पाटील यांचे शुभहस्ते एका कदंबाचे वृक्षारोपण करण्यात आले.

The Post-Centennial Silver Jubilee celebrations concluded in an impressive function on Wednesday the 19th April 2010, which was graced by Her Excellency Honourable Shrimati Pratibha Devisingh Patil, President of India. Dignitaries on the dais are seen with the copy of this souvenir published on the occasion. From L to R: Dr. S. N. Kanetkar (Secretary of the Society), Shri Vikas Kakatkar (Vice-Chairman of the Council of the Society), Shri Devisingh Patil, Shri Subhash Zanak (Minister of Women and Child Development of Maharashtra), Honourable Shrimati Pratibha Devisingh Patil (President of India), Shri Chhagan Bhujbal, Dy. Chief Minister of Maharashtra, Chhatrapati Shri Shahu Maharaj, President of the Society, Dr. Ajit Patwardhan, Chairman of the Council of the Society, Dr. Ravindrasinh Pardeshi, Principal of Fergusson College




भारताच्या माननीय राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा देवीसिंह पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शतकोत्तर रौप्यमहोत्सवाची सांगता बुधवार दिनांक १९ एप्रिल २०१० रोजी एका दिमाखदार कार्यक्रमात झाली. छायाचित्रात या प्रसंगी प्रकाशित केलेल्या या स्मरणिकेच्या प्रतीसह व्यासपीठावरील सन्माननीय (डावीकडून) : संस्थेचे कार्यवाह डॉ. श्री. नी. कानेटकर, संस्थेच्या परिषदेचे उपाध्यक्ष श्री. विकास काकतकर, श्री. देवीसिंह पाटील, राज्याचे महिला आणि बालकल्याणमंत्री श्री. सुभाष झनक, माननीय राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा देवीसिंह पाटील, उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ, संस्थेचे अध्यक्ष छत्रपती श्री शाहू महाराज, संस्थेच्या परिषदेचे अध्यक्ष डॉ. अजित पटवर्धन आणि फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्रसिंह परदेशी

A section of audience at the concluding ceremony on 19th April 2010. In the first row from L to R: (1) Shri Suryakant Pathak (Ex-Chairman of the Council of the Society), (2) Shri Prashant Gokhale (Member of DES Council), (5) Air Marshal Bhooshan Gokhale, (6) Dr. S. B. Mujumdar of Symbiosis, (7) Dr. Vishwanath Karad of Maharashtra Institute Technology, (8) Dr. M. G. Takwale (Ex-VC of Shivaji University), (9) Dr. Arun Nigvekar (Ex-Chairman, UGC), (10) Dr. Ram Takwale (Ex-VC University of Pune), (11) Dr. Raghunath Shevgaonkar (VC of University of Pune)



सांगता समारंभ कार्यक्रमप्रसंगी उपस्थित मान्यवर (डावीकडून) : (१) संस्थेच्या परिषदेचे माजी अध्यक्ष श्री. सूर्यकांत पाठक, (२) संस्थेच्या परिषदेचे सदस्य श्री. प्रशांत गोखले, (५)एअर मार्शल श्री. भूषण गोखले, (६) सिंबायोसिसचे डॉ. शां. ब. मुजुमदार, (७) महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे डॉ. विश्वनाथ कराड, (८) शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मु. ग. ताकवले, (९) विश्वविद्यालय अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अरूण निगवेकर, (१०) पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राम ताकवले, (११) पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रघुनाथ शेवगांवकर

References
History of Deccan Education Society by Prof. P. M. Limaye
The Deccan Education Society 1885-1960 by Prof. K. G. Pandit
Annual Reports of the Society for the years 1880 to 1884
(school only) and 1884 onwards upto 1932 and 1984-85
Our Educational Effort: Fergusson College Through Sixty years by
Prof Shripad Rama Sharma 1945
Fergusson College Magazine Platinum Jubilee Issue 1960
Fergusson College Centenary Souvenir 1985
Fergusson College Visitors' Book in B. J. Wadia Library
Chintamanrao College of Commerce, Sangli, Silver Jubilee Souvenir 1985
Shala Mauli Shatabdi Souvenir, 1899-1999
The annals of Deccan Education Society's Brihan Maharashtra College of
Commerce Pune by H. Y. Kulkarni
Rajarshi Shahu Smarak Granth Ed. by Dr. Jaysingrao Pawar
The History of Indian National Congress (1885-1935)
by Shri Pattabhi Sitaramayya

**संदर्भ**
हिस्टरी ऑफ डेक्कन एज्युकेशन सोसायटी-ले. प्रा. प. म. लिमये.
द. डेक्कन एज्युकेशन सोसायटी १८८५-१९६०- ले. प्रा. के. गो. पंडित.
संस्थेचे १८८० ते १८८४ (फक्त शाळा) व १८८४ पासून १९३२ पर्यंतचे आणि
१९८४-८५ चा वार्षिक अहवाल.
आवर एज्युकेशनल एफर्ट : फर्ग्युसन कॉलेज थ्रू सिक्स्टी इयरस्
संपादक प्रा. श्रीपाद राम शर्मा १९४५
फर्ग्युसन महाविद्यालय वार्षिकांक अमृत महोत्सव विशेषांक १९६०.
फर्ग्युसन महाविद्यालय शताब्दी स्मरणिका १९८५.
फर्ग्युसन महाविद्यालय बी. जे. वाडिया ग्रंथालय अभ्यागत नोंदवही.
चिंतामणराव व्यापार महाविद्यालय रौप्यमहोत्सव स्मरणिका १९८५.
शालामाउली शताब्दी स्मरणिका १८९९-१९९९.
द ॲनल्स ऑफ डेक्कन एज्युकेशन सोसायटीज बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स पुणे
लेखक प्रा. एच्. वाय. कुलकर्णी
राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ संपादक डॉ. जयसिंगराव पवार.
भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा इतिहास (१८८५-१९३५) ले. श्री. पट्टाभी सीतारामय्या.



GEOGRAPHICAL SPREAD OF
THE DECCAN EDUCATION SOCIETY
1884 - 2010




**डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा भौगोलिक विस्तार १८८४-२०१०**

**Published By**
The Secretary,
Deccan Education Society, Pune, Fergusson College Campus,
Pune 411 004
For Private Circulation only
First Edition : 19.04.2010 - Revised Edition : 09.08.2010
© All copyrights with the Deccan Education Society, Pune

**प्रकाशनद्वारा**
कार्यवाह,
डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे, फर्ग्युसन महाविद्यालय परिसर, पुणे - ४११ ००४.
खासगी वितरणासाठी
प्रथम आवृत्ती : १९.०४.२०१० - सुधारित आवृत्ती : ०९.०८.२०१०
© सर्व हक्क सुरक्षित डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे.

## About this publication...

The preparation of this commemorative volume sketching the pictorial History of the Society and its Institutions was an entirely enjoyable and educative experience. Trying to do so within the limits of 160 pages and yet do justice to represent the 125 years is an impossible task for many reasons. Yet this has been attempted within the limitations of the available photographs and available documentary resources.

The book is titled 'Deccan Education Society, Pune - 125 Years in Pursuit of Excellence. A Photo Journey: 1884-2009'. Accordingly, major events of starting of Society's institutes, of celebration of jubilee years in presence of eminent scientists, leaders, educationists, administrators, have been selected. The visits by persons of eminence are also covered. The outstanding success of students is celebrated. Some events deserved presentation in the form of many photographs and this has been done in the collage form. There are photographs of old historic buildings, new buildings, paintings. Captions are attempted to be informative. Images of old documents are presented to compensate for the scarcity of photographs of events in the early days. A separate partial list of references is included. Every date mentioned has been cross-checked with the help of more than one reference, wherever possible. With a view to reaching out to many, the text is presented in both English and Marathi. Attempt has also been made to present the names of most persons in English and Marathi appropriately.

I feel indebted to the entire Governing body and in particular Chairman Dr. Ajit Patwardhan and Vice Chairman Shri Vikas Kakatkar for entrusting me with the responsibility and providing me with the opportunity to work on the project and for their full faith and solid support for the project.

It is a matter of great joy and honour that this issue is being released in the august presence of Her Excellency Honourable President of India Smt. Pratibha Devisingh Patil.

Despite all the efforts by many, on account of severe limitations on time to work, there might be inadequacies and errors for which I am responsible. I wish to give the credit for everything done well to all the rest of the team who worked selflessly and tirelessly. However the feeling that 'it could have been done better with more time becoming available' even remains after the revision. forever. It is sincerely hoped that the effort is received well by the readers.

Anand Bhide
Editor

## या प्रकाशनाविषयी

संस्था आणि संस्थेच्या घटक संस्थांचा चित्रमय इतिहास रेखाटणारी ही स्मरणिका तयार करणे हा एक आनंददायी आणि शिकवून जाणारा अनुभव होता. अनेकविध कारणांमुळे १६० पानांच्या मर्यादेत राहताना १२५ वर्षांच्या अस्तित्वाला न्याय देत प्रातिनिधीक स्वरूप देत अशी स्मरणिका तयार करणे अशक्यप्राय गोष्ट आहे. आणि असे असूनही उपलब्ध छायाचित्रे आणि कागदपत्रे यांच्या मदतीने करण्याचा हा प्रयत्न केला आहे.

'डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे गुणवत्तेच्या ध्यासाची १२५ वर्षे १८८४-२००९' असे या प्रकाशनाचे नामकरण केले आहे. त्या अनुषंगाने संस्थेच्या इन्स्टिट्यूटस्‌ची स्थापना, मान्यवर शास्त्रज्ञ, नेते, शिक्षणतज्ञ किंवा प्रशासक अशांच्या उपस्थितीत साजरे केलेली महोत्सवी वर्षे असे प्रसंग निवडले आहेत. थोरामोठ्यांच्या संस्थेला भेट देण्याचे प्रसंग आहेत आणि विद्यार्थ्यांचे उत्तुंग यश समारंभपूर्वक साजरे करण्याचे प्रसंगही आहेत. अनेक छायाचित्रांचा वापर करून मांडावेत असे प्रसंग आहेत. यासाठी कोलाजचा वापर केला आहे. जुन्या ऐतिहासिक वास्तूंची छायाचित्रे आहेत तशीच नव्या वास्तूंचीही आहेत. छायाचित्रांचे वर्णन माहितीपूर्ण करण्याचा प्रयत्नही केला आहे. जुन्या कागदपत्रांची छायाचित्रे तयार करून त्या काळातील छायाचित्रांच्या कमतरतेची भरपाई करण्याचा प्रयत्न केला आहे. एका स्वतंत्र संदर्भसूचीचा समावेशही केलेला आहे. प्रत्येक दिनांकाचा उल्लेख करताना शक्यतो एकापेक्षा अधिक संदर्भाशी जुळवून पाहिला आहे. जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोचावे या हेतूने लिखित भाग इंग्रजी व मराठी अशा दोन भाषांत दिला आहे. बहुतांश व्यक्तींची नावे मराठी व इंग्रजीत त्या त्या भाषेप्रमाणे येतील असा प्रयत्नही केला आहे.

या प्रकल्पाचे काम करण्याची जबाबदारी आणि संधी मला दिल्याबद्दल आणि हे करण्यासाठी माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवून पाठबळ दिल्याबद्दल मी संपूर्ण नियामक मंडळ आणि विशेषतः अध्यक्ष डॉ. अजित पटवर्धन आणि उपाध्यक्ष श्री. विकास काकतकर यांचे प्रति कृतज्ञ आहे. माननीय राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा देवीसिंह पाटील यांच्या सन्माननीय उपस्थितीत या पुस्तकाचे प्रकाशन होणे हा खूपच आनंदाचा आणि सन्मानाचा विषय आहे. अनेकजणांनी खूप प्रयत्न केले तरी वेळेच्या मर्यादेमुळे काही त्रुटी, अपुरेपणा राहिलेला असू शकतो ज्याचे सारे उत्तरदायित्व माझे आहे.

यात जे काही चांगल्या पध्दतीने उतरले असेल त्याचे सर्व श्रेय मी बाकी सर्वांना देऊ इच्छितो, ज्यांनी निःस्वार्थ आणि अथकपणे काम केले. तरीही थोडा आणखी वेळ असता तर आणखी चांगले काम केले असते ही भावना सुधारित आवृत्तीतही कायम आहे. या प्रयत्नांचा वाचक उत्साहाने स्वीकार करतील अशी मनःपूर्वक आशा आहे.

आनंद भिडे
संपादक

The present (fifth) President
of the Society
Chhatrapati Shri Shahu
Maharaj of Kolhapur
Since 1984



संस्थेचे विद्यमान (पाचवे) अध्यक्ष
छत्रपती श्री. शाहू महाराज,
कोल्हापूर
१९८४ पासून

The present (Since January 2009) Governing Body of the Deccan Education Society.
Seated from L to R: Shri Kiran Shaligram, Dr. Ajit Patwardhan (Chairman), Shri Vikas Kakatkar (Vice Chairman), Dr. Shrikrishna Kanetkar (Secretary of the Society).
Standing from L to R: Prof. Anand Bhide (Secretary of the Governing Body), Shri Ram Nimbalkar, Principal Dr. Ravindrasinh Pardeshi, Shri Mahesh Athavale.



संस्थेचे २००९ पासून अस्तित्वात असलेले नियामक मंडळ
खुर्चीत बसलेले (डावीकडून): श्री. किरण शाळीग्राम, अध्यक्ष डॉ. अजित पटवर्धन, उपाध्यक्ष श्री. विकास काकतकर, संस्थेचे कार्यवाह डॉ. श्रीकृष्ण कानेटकर
पाठीमागे उभे (डावीकडून): नियामक मंडळाचे कार्यवाह प्रा. आनंद भिडे, श्री. राम निंबाळकर, प्राचार्य डॉ. रविंद्रसिंह परदेशी, श्री. महेश आठवले.

They were the young men, who decided to relinquish all the worldly career opportunities and pleasures in favour of serving the motherland and its people by dedicating themselves to the cause of education. They first started the New English School (1880) and then established the Deccan Education Society (October 1884) and the Fergusson College (January 1885). Their work became inspiration to many. And many more educational institutions came into existence all over India by following their example.


Vaman Shivram Apte


Bal Gangadhar Tilak


Vishnushastri Chiplunkar


Mahadeo Ballal Namjoshi


Gopal Ganesh Agarkar

आपली मातृभूमी आणि देशबांधवांच्या सेवेसाठी सर्व सुखांचा, सहज मिळू शकणाऱ्या आकर्षक सरकारी नोकरीचा त्याग करणाऱ्या या साऱ्या तरूणांनी संस्थेची स्थापना केली.
सर्वप्रथम १८८० मध्ये न्यू इंग्लिश स्कूल सुरू केल्यानंतर ऑक्टोबर १८८४ मध्ये त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि जानेवारी १८८५ मध्ये फर्ग्युसन महाविद्यालयाची स्थापना केली.
त्यांचे हे काम अनेकांना प्रेरणा देणारे ठरले आणि त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन अनेक शिक्षणसंस्था देशभरात सुरू झाल्या.

The first President of the Society
Rajarshi Chhatrapati Shri Shahu Maharaj, Kolhapur
1884 to 1922

Chhatrapati Shri Shahu Maharaj was coronated at the age of 10 on 17th March 1884. Immediately thereafter, the Founders of the Society, out of their deep respect towards the crown seat of Kolhapur, requested the Maharaja to be the President of the Society. His highness kindly accorded his consent to their request. The Hon'ble Maharaja of Kolhapur thus became the first President of the Society. The progressive minded Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj's work in the field of social reforms is legendary.



संस्थेचे प्रथम अध्यक्ष
राजर्षी छत्रपती श्री. शाहू महाराज, कोल्हापूर.
१८८४ ते १९२२

१७ मार्च १८८४ रोजी वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी छत्रपती शाहू महाराज कोल्हापूरच्या गादीवर आल्यानंतर, कोल्हापूरच्या गादीविषयीच्या असलेल्या अतीव आदरामुळे संस्थापकांनी महाराजांना संस्थेचे अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती केली. या विनंतीला आदरणीय महाराजांनी अनुमती दिली. अशा प्रकारे कोल्हापूरचे आदरणीय महाराज हे संस्थेचे पहिले अध्यक्ष झाले. प्रागतिक विचारांच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे समाज सुधारणाविषयक कार्य अतुलनीय अलौकिक आहे.

With the starting of New English School at Morobadada Wada on 1st January 1880 by Vishnushastri Chiplunkar, Bal Gangadhar Tilak and Mahadeo Ballal Namjoshi, began a new era in the field of education in India. Gopal Ganesh Agarkar and Vaman Shivram Apte joined them in the year to follow. In the address presented to the President of the Education Commission in 1882, they stated “We believe a nation, that has not taken its education in its own hands, cannot soon rise in literary, social or political importance, and it was this thought that prompted us to open the NEW ENGLISH SCHOOL, with the object of doing something calculated to bring about, though to a small degree, this desired objective.” The first photograph shows the Morobadada Wada. The second is a Group Photograph of some students (from the collection with the New English School, Ramanbag, Pune) who were enrolled by Vishnushastri Chiplunkar in the New English School in 1880. From L to R: Shri Avasthi, Shri K. G. Limaye, Shri Vamanrao Potdar, Shri Vinayakrao Ranade, Shri R. K. Bhide, Shri Babasaheb Ranade.





१ जानेवारी १८८० रोजी मोरोबादादा वाड्यात विष्णुशास्त्री चिपळूणकर, बाळ गंगाधर टिळक आणि महादेव बल्लाळ नामजोशी यांनी न्यू इंग्लिश स्कूलची सुरूवात केली आणि भारताच्या शिक्षणक्षेत्रात एका नव्या अध्यायाची सुरूवात झाली. गोपाळ गणेश आगरकर आणि वामन शिवराम आपटे हे पुढच्याच वर्षात त्यांना येऊन मिळाले. १८८२ मध्ये शिक्षण आयोगापुढे मांडलेल्या कैफियतीत त्यांनी म्हटले आहे, ‘आपल्या शिक्षणाचा विषय जे राष्ट्र आपल्याहाती  घेत नाही त्या राष्ट्राचा शैक्षणिक, सामाजिक वा राजकीय उध्दार लवकर होणे शक्य नाही अशी आमची धारणा आहे आणि याच विचाराने या उद्दिष्टाप्रत पोचण्यासाठी निश्चित काही करण्याच्या हेतूने आम्ही न्यू इंग्लिश स्कूल सुरू केले आहे.’ सोबत मोरोबादादा वाड्याचे छायाचित्र आहे.

दुसऱ्या छायाचित्रात (न्यू इंग्लिश स्कूल रमणबागेच्या संग्रहातून) श्री. विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी १८८० मध्ये स्वत: पटावर ज्यांची नावे दाखल केली असे काही विद्यार्थी (डावीकडून) : श्री. अवस्थी, श्री. के. जी. लिमये, श्री. वामनराव पोतदार, श्री. विनायकराव रानडे, श्री. आर्.के. भिडे, श्री. बाळासाहेब रानडे.

An old picture in the book ‘The Deccan Education Society 1885-1960’ shows the founders in a meeting.



‘द डेक्कन एज्युकेशन सोसायटी १८८५–१९६०’ या पुस्तकातील, संस्थापक एका बैठकीस बसलेले आहेत असे दर्शविणारे एक चित्र.

The need and desire to establish a college led first to form a society: Deccan Education Society on 24th October 1884 and Fergusson College thereafter on 2nd January 1885. The accompanying photograph shows the drawing hall of Gadre Wada, where the first meeting of formation of the Society was held. In the invitation for the meeting sent by Shri V. S. Apte to many sympathizers of private education like Justice M. G. Ranade, he wrote:

Poona
New English School
21st October 1884

Dear Sir,

A meeting of the sympathizers of Private Education will be held in Gadre's Wada, Shanwar Peth, Poona on Friday 24th instant at 08-30 A. M. (Madras Time) precisely, for the formation of the proposed Society and appointment of the Council and Trustees (as per rules appended). I shall feel obliged by your honouring the occasion with your presence.

Yours truly
V. S. Apte
Superintendent



महाविद्यालय स्थापना करण्याच्या हेतूने प्रथम २४ ऑक्टोबर, १८८४ रोजी डेक्कन एज्युकेशन सोसायटी व पाठोपाठ २ जानेवारी, १८८५ रोजी फर्ग्युसन महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. सोबतच्या छायाचित्रात गद्रे वाड्याचा दिवाणखाना दिसत आहे. याच ठिकाणी संस्थेच्या स्थापनेची पहिली बैठक झाली.

न्या. महादेव गोविंद रानडे यांसारख्या खासगी शिक्षणाच्या सहानुभूतीदारांना पाठविलेल्या बैठकीच्या निमंत्रणात श्री. वा. शि. आपटे यांनी लिहिले होते :

पुणे
न्यू इंग्लिश स्कूल,
२१ ऑक्टोबर, १८८४

प्रिय महोदय,

प्रस्तावित संस्थेची स्थापना आणि परिषद व विश्वस्तांची नियुक्ती करण्यासाठी (सोबत जोडलेल्या नियमानुसार), खासगी शिक्षणाच्या सहानुभूतिदारांची बैठक येत्या शुक्रवारी, २४ तारखेस सकाळी ठीक ८.३० वाजता (मद्रास वेळेनुसार) गद्रे वाडा, शनिवार पेठ, पुणे येथे होईल. आपली या वेळची उपस्थिती महत्वाची असून आपल्या उपस्थितीकरिता मी आपला उपकृत असेन.

आपला विश्वासू,
वा. शि. आपटे
सुपरिंटेन्डन्ट

The Society was duly registered with the "Registrar of Joint Stock Companies, Bombay" under Act No. XXI of 1860 of the Legislative Council of India.
The picture shows the Certificate of Registry alongside the photograph of the Gadre Wada, where the first meeting of formation of the Society was held.


(2)(a) 15-8-85 29

CERTIFICATE of REGISTRY of the MEMORANDUM of ASSOCIATION and COPY of the RULES of the

Deccan Education Society Poona

under Act No. XXI. of 1860 of the Legislative Council of India.

I CERTIFY that the above Society has this day been duly Registered pursuant to the provisions of the abovenamed Act.

Dated at Bombay the Thirteenth day of August 1885.

Registrar of Joint Stock Companies,



भारताच्या वैधानिक परिषदेच्या विधि क्र. २१ (१८६०) नुसार संस्थेची विधिवत नोंद 'रजिस्ट्रार ऑफ जॉईंट स्टॉक कंपनीज, बॉम्बे' यांच्याकडे झाली.
पहिल्या छायाचित्रात या नोंदणीचे प्रमाणपत्र आणि सोबतच्या छायाचित्रात संस्थेच्या स्थापनेची पहिली बैठक जिथे झाली तो गद्रेवाडा दिसत आहे.

# Deccan Education Society Pune

# 1885-1909

Sir James Fergusson (1832-1907), sixth baronet of Kilkerran and the then Governor of Bombay, was the first patron of the Society. As Governor he was popular for his humane and generous policy regarding the famine laws and Agriculturists' Relief Act as also for his interest in the spread of education. In recognition of his support and contribution the founders requested him for permission to name the proposed new college as Fergusson College, which he graciously granted.

*"In the common life of this COLLEGE, as venerable custom, no principle of religion or caste will be violated, but we may trust that jealousies which distract and weaken the community will by the harmonious working of intellectual life, be moderated and even extirpated"*

*Sir James Fergusson, Ex-Governor of Bombay during his last visit to the College on 13th February 1895.*



किल्केरनचे सहावे बॅरोनेट सर जेम्स फर्ग्युसन हे संस्थेचे पहिले आश्रयदाते होते व मुंबईचे गव्हर्नर होते.

दुष्काळविषयक तसेच शेतकरी सवलत कायदा याबाबतचे सहदय व उदार धोरण आणि शिक्षणप्रसारातील असलेल्या रूचिमुळे ते लोकप्रिय गव्हर्नर होते. संस्थेस त्यांनी दिलेली देणगी व पाठिंबा या विषयी संस्थापकांच्या मनात कृतज्ञतेची भावना होती आणि त्यामुळे नव्या महाविद्यालयाचे नाव 'फर्ग्युसन महाविद्यालय' असे ठेवण्यासाठी संस्थापकांनी त्यांची अनुमती मागितली आणि त्यांनीही ती दिलदारपणे दिली. मुंबईचे माजी गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन यांनी आपल्या १३ फेब्रुवारी १८९५ रोजीच्या महाविद्यालयाला दिलेल्या अखेरच्या भेटीच्या वेळी आपल्या भावना खालील प्रमाणे व्यक्त केल्या होत्या.''या महाविद्यालयाची एक आदर्श पध्दत म्हणून कोणत्याही जाती व धर्माचा अनादर केला जाणार नाही. किंबहुना इथल्या एकसंघ बौध्दिक कार्याद्वारे समाजाला विचलित करणाऱ्या आणि दुबळ्या बनवणाऱ्या मत्सराच्या भावनांची प्रखरता कमी होवो किंबहुना अशा भावना नष्ट होवोत.''

Accompanying image is of the letter (no. 1443 of 1884-85 dated 27.01.1885) of recognition of the Fergusson College by the University of Bombay, addressed to Sir William Wedderburn, Chairman of the Provisional Council of the Deccan Education Society, Poona.



No 1443 of 1884-85

Office of the University Registrar
Bombay, January 23/1885.

To
Sir William Wedderburn Bart
Chairman Provisional Council
of the Deccan Education
Society, Poona.

Sir,

With reference to your letter No 5 of 1884, I have the honour to inform you that at a meeting of the Senate held on the 13th December last, the following Resolution was unanimously adopted:-

"That the new College at Poona called "The Fergusson College" be recognized in the Faculty of Arts for the purposes of the Previous Examination for three years from the current Term".

I have the honour to be
Sir,
Your most obedient servant
P Peterson
University Registrar.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या अस्थायी परिषदेचे अध्यक्ष
सर विल्यम वेडरबर्न यांना उद्देशून लिहिलेले
फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मान्यतेचे मुंबई विद्यापीठाचे १८८४-८५ चे
पत्र क्र. १४४३ दि. २७.०१.१८८५

Sir William Wedderburn was the Chairman of the first Provisional Council of the Deccan Education Society in 1884. Sir William was a great friend of India and played an important role in the formation of the Indian National Congress towards December 1885. He presided over the annual sessions of the Congress twice: in 1889 (Bombay) and in 1910 (Allahabad).



सर विल्यम वेडरबर्न संस्थेच्या पहिल्या अस्थायी परिषदेचे अध्यक्ष होते. सर विल्यम भारताचे हितचिंतक मित्र होते. डिसेंबर १८८५ मधे स्थापन झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १८८९ ची मुंबई व १९१० च्या अलाहाबाद काँग्रेसचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले.

Principal Vaman Shivram Apte was a great Sanskrit scholar and has the distinction of being the first Secretary of the Society, the first Principal of Fergusson College and simultaneously being the Superintendent of the New English School. The Sanskrit-English Dictionary compiled by Principal Apte and his other publications are some of the most important references in the subject even today. The photograph shows early editions of some of these publications alongwith a recent one.




संस्कृतचे गाढे विद्वान असलेल्या प्राचार्य वामन शिवराम आपटे यांनी संस्थेचे पहिले कार्यवाह, फर्ग्युसन महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य या मोठ्या जबाबदाऱ्या एकाचवेळी निभावताना न्यू इंग्लिश स्कूलचे सुपरिटेन्डन्ट म्हणूनही काम पाहिले. त्यांनी रचलेला संस्कृत-इंग्लिश शब्दकोश आणि त्यांची अन्य प्रकाशने आजही या विषयातील अत्यंत महत्वाचे संदर्भग्रंथ म्हणून गणले जातात. या प्रकाशनांच्या सुरवातीच्या काळातल्या आवृत्यांचे अलिकडच्या आवृत्तीबरोबरचे हे छायाचित्र.

This earliest extant group photograph in the history of the Society shows Principal Agarkar with students at the Social Gathering of the College in 1894. The photograph was taken in the quadrangle of the old Nana Wada.

From L to R in chairs: Profs. D. K. Karve, G. K. Gokhale, C. G. Bhanu, Vasudevshastri Abhyankar, D. T. Chandorkar, Principal G. G. Agarkar, V. B. Kelkar, M. S. Gole, P. R. Limaye, V. B. Bhate, G. V. Lele

Standing immediately behind the chairs from L to R: (1) G. G. Dixit(Drill Master), (2) --, (3) V. R. Gupte, (4) K. R. Kanitkar, (5) V. B. Joglekar, (6) Talashikar, (7) R. P. Paranjpye, (8) V. R. Shinde, (9) G. R. Abhyankar, (10) Gangal, (11)--, (12) --, (13) S. B. Sant, (14) S. D. Pavte, (15) --



१८९४ मधील स्नेहसंमेलनाच्या वेळचे हे समूह छायाचित्र संस्थेच्या इतिहासातील उपलब्ध असलेले सर्वात जुने छायाचित्र आहे. जुन्या नानावाड्याच्या चौकात घेतलेल्या या चित्रात विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य आगरकर आहेत. खुर्चीतील (डावीकडून) प्रा. धों. के. कर्वे, प्रा. गो. कृ. गोखले, प्रा. चिं. गं. भानू, प्रा. वासुदेवशास्त्री अभ्यंकर, प्रा. दि. त्र्यं. चांदोरकर, प्राचार्य गो. ग. आगरकर, प्रा. वा. ब. केळकर, प्रा. म. शि. गोळे, प्रा. पु. रा. लिमये, प्रा. वि. बा. भाटे, प्रा. गं. वा. लेले,

खुर्ची मागे पहिली रांग (डावीकडून) जी. जी. दिक्षित, क्ष, व्ही. आर्. गुप्ते, के. रा. कानिटकर, व्ही. बी. जोगळेकर, तळाशिकर, र. पु. परांजप्ये, वि. रा. शिंदे, जी. आर्. अभ्यंकर, गांगल, --, --, एस्. बी. संत, एस्. डी. पावटे, --

On 5th March 1885 at the time of corner stone laying ceremony of common building for New English School and Fergusson College at Budhwar Baug in the heart of the city, Sir James Fergusson prophesied that the school in connection with the college might possibly grow so large that it would have to be divided and then it might be possible to locate it in the open country and supply it with such advantages as spacious playgrounds and residences for professors and students. This prophecy came true, when the land on the outskirts in the Chaturshringi plains was acquired in 1891. This aerial photograph in the society's collection belonging to late thirties provides a beautiful view of the Fergusson College campus and surroundings.



शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या बुधवार बाग येथे न्यू इंग्लिश स्कूल आणि फर्ग्युसन महाविद्यालयासाठी योजलेल्या सामायिक इमारतीच्या कोनशिला बसविण्याच्या समारंभात ५ मार्च, १८८५ रोजी सर जेम्स फर्ग्युसन यांनी म्हटले की ''शाळा आणि महाविद्यालयाचा इतका विस्तार होईल की या दोन्हीचे यथावकाश विभाजन करावे लागेल आणि ते (महाविद्यालय) मोकळया जागेत नेऊन प्रशस्त क्रीडांगणे, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी निवास व्यवस्था या प्रकारच्या सुविधा तेथे तयार करता येतील'' १८९१ मध्ये चतु:शृंगीच्या माळावर घेतलेल्या जागेच्या रूपाने हे भाकित खरे ठरले. संस्थेच्या संग्रहातील या छायाचित्रात १९३० च्या दशकातील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या सुंदर परिसराचे विहंगम दृश्य दिसत आहे.

The foundation stone of the new college building of the Fergusson College on the present campus was laid by His Excellency the Right Honourable George Robert Canning Harris, Governor of Bombay in January 1892. The accompanying text is a part of the schedule giving specifications of the foundation and plinth of the building, now called the Main Building.




सध्याच्या ठिकाणावर असलेल्या महाविद्यालयाच्या नवीन इमारतीची कोनशिला मुंबईचे गव्हर्नर नामदार जॉर्ज रॉबर्ट कॅनिंग हॅरिस यांचे हस्ते ११ जानेवारी १८९२ रोजी बसविण्यात आली. या कोनशिलेच्या छायाचित्रासोबत आहे ते मुख्य इमारतीच्या पायाभरणी आणि जोत्याच्याबांधकामाचे तांत्रिक वर्णन देणारे परिशिष्टाचे छायाचित्र.



## पुणें फरग्यूसन कॉलेजाच्या इमारतीच्या पायाचें व जोत्याचें काम करावयाचें आहे त्याचें वर्णन.

१. पायाची मध्यम खोली ६ फुटांहून जास्त होणार नाहीं, व रुंदी २॥ फुटांपेक्षां कमी नाहीं. खोदाई मातींत व मुरमांत व्हावयाची. खोदलेली माती इमारतीपासून ३० फूट अंतरावर टाकावयाची. सर्व खोदाई लाइनींत, साधनींत, व ओळंब्यांत असली पाहिजे. कोणत्याही कारणानें खोदाई मारून दिलेल्या लाइनींपेक्षां रुंदींत किंवा हुकुमाबाहेर खोलींत जास्त झाल्यास त्याची जोखम मक्तेदारावर राहील.

१...४..... भाव शंभर घनफुटांस

२. पाया भरण्यास भांबुरडे नजीकच्या अगर इतर कोणत्याही खाणीचा उत्तम दगड मिळेल तो इंजिनियर यांणीं पसंत केल्यावर वापरावा. रेती होळकर पुलाची किंवा इतर जागची चांगली स्वच्छ विन मातीची व कठीण असावी. चुना बंडचा खडयाचा पक्का भाजलेला विरविल्याशिवाय एक भाग मापानें व रेती अडीच भाग घाणींत टाकून घाणी ६ तास चालवावी, आणि असा तयार झालेला चुना घाणींतून निघाल्यावर तीन दिवसांनीं वापरावा. मळलेला चुना १० दिवसांपेक्षां जास्ती अवकाशपर्यंत वापरल्याशिवाय राहिल्यास तो पुन्हा ३ तास मळावा लागेल. चुन्याची भट्टी इमारतीनजीक जी जागा इंजिनियर दाखवितील तेथें बांधावी. कारखान्यास लागणारें पाणी कालव्याचें घ्यावें; त्याबद्दल खर्च लागेल तो मक्तेदारावर पडणार नाहीं. बांधकामाचे थर दोरींत ओळंब्यांत व साधनींत इंजिनियर सांगतील तितक्या उंचीचे असावे. चुना बांधकामांत भरपूर घालावा, आणि दगड मिळेल तितका मोठा वापरावा. मोठ्या दगडाचे मध्यें लागतीलशा लहान काचळा वापराव्या, व बांधकामांतील प्रत्येक दगड हातोड्यानें ठोकून बसवावा. काम वाईट झाल्याचा जेथें संशय येईल तेथें तें उकरून पाहावें लागेल. त्याबद्दल मक्तेदारास नुकसान मिळणार नाहीं. चुन्याच्या घाण्या दोन बांधाव्या लागल्यास एकीच्या खर्चाबद्दल मक्तेदारास ३० रुपये मिळतील, व ती घाणी काम झाल्यावर मक्तेदारास ( चाक दांड्यासुद्धां ) परत मिळणार नाहीं- पायाच्या दोहों बाजूंस रिकामी जागा राहील [illegible] माती भरून ठोकावी, त्याबद्दल वेगळा भाव मि[illegible] नाहीं.१४... • ... • भाव दर शंभर घनफु[illegible]

On Wednesday the 27th March 1895 on the auspicious day of Gudhi Padwa: The New Year Day, the Main Building of Fergusson College was inaugurated at the hands of Lord Sandhurst, Governor of Bombay. Shri Shahu Chhatrapati, Maharaja of Kolhapur and the young President of the Society had specially arrived for the function. The classes were transferred to the new building in June. The only buildings on the college grounds at that time were the main college building, the Principal's bungalow, the hostel for 100 students with subsidiary buildings and the private house of Principal Agarkar. This photograph belongs to the early years of the Main Building. Of the total cost of Rs. 1, 55, 000 of these constructions, lion's share of fund collection was done by Prof. Gopal Krishna Gokhale (Inset).



गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर बुधवार दिनांक २७ मार्च १८९५ रोजी फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीचे मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड सॅण्डहर्स्ट यांचे हस्ते उद्घाटन झाले. या कार्यक्रमास संस्थेचे तरूण अध्यक्ष श्री शाहू छत्रपती, कोल्हापूरचे महाराज आवर्जून उपस्थित होते. जून महिन्यात या इमारतीत वर्ग भरायला सुरूवात झाली. महाविद्यालयाच्या प्रांगणात यावेळी महाविद्यालयाची मुख्य इमारत, प्राचार्य आगरकरांचे व्यक्तिगत घर, प्राचार्यांचा बंगला आणि शंभर विद्यार्थ्यांची सोय असणारे वसतीगृह एवढ्याच इमारती होत्या. सोबत मुख्य इमारतीचे सुरूवातीच्या काळातले छायाचित्र आहे तर आतील चौकटीत आहेत प्रा. गोपाळ कृष्ण गोखले, ज्यांनी या इमारतीसाठी लागणारा निधी गोळा करण्यात सिंहाचा वाटा उचलला.

In grateful recognition of the generosity of Thakoresahib of Gondal who contributed Rs. 20,000, the hostel for students was named after him as "Sir Bhagwatsinghji Students' Quarters" (Block I). The inauguration took place on 27th March 1895 at the hands of Lord Sandhurst, Govermor of Bombay. The photograph shows the building and His Highness Sir Bhagwatsinghji (Inset).



गोंडलचे ठाकूरसाहेब यांनी रूपये वीस हजारांची देणगी संस्थेला या सुमारास दिली. संस्थेने त्यांच्या या औदार्याविषयीची कृतज्ञता विद्यार्थी वसतीगृहाचे त्यांच्या नावाने नामकरण करून व्यक्त केली. सर भागवतसिंहजी स्टूडन्टस् क्वॉर्टर्स असे नामकरण केलेल्या या वसतीगृहाचे उद्घाटनही मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड सॅण्डहर्स्ट यांच्या हस्ते २७ मार्च १८९५ रोजी झाले. छायाचित्रात हे वसतीगृह तर आतील चौकटीत ठाकूरसाहेब यांचे चित्र दिसत आहे.

The rooms in the Sir Bhagwatsinghji Students' Quarters (now more popularly known as Block I) where Swatantryaveer Vinayak Damodar Sawarkar and great Marathi Litterateur Ram Ganesh Gadkari resided during their student days 1902-05 are seen in the photographs.
The third photograph belongs to The Dramatic Group : College Socil Gathering, 1902.
First Row : (Sitting) V. B. Bapat, V. D. Savarkar, Bidikar, S. V. Gokhale, S. V. Bapat.
Second row (Chairs) : Vaze, V. V. Sathaye, K. R. Kanitkar, G. Y. Mhaiskar, P. G. Gokhale, D. N. Apte.
Third Row (Standing) : R. K. Lagu, K. G. Kurane, Chakradev, N. L. Ranade, Deo. S. G. Gokhale, D. N. Mengade.
Forth Row (Standing) : D. K. Parashuraman, B. G. Gokhale, V. J. Gokhale, Kolhatkar, G. S. Marathe, R. V. Damle.









सर भागवतसिंहजी स्टूडन्टस् क्वॉर्टर्स मधील (आता ब्लॉक एक म्हणून ओळखले जाणारे वसतीगृह)
स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर आणि मराठी साहित्यिक राम गणेश गडकरी हे विद्यार्थीदशेत रहात असलेल्या खोल्यांची ही छायाचित्रे आणि तिसरे छायाचित्र आहे
१९०२ च्या विद्यार्थी स्नेहसंमेलनाच्या नाटक मंडळाचे ज्यात पहिल्या रांगेत खाली बसलेले दुसरे आहेत विनायक दामोदर सावरकर.
पहिली रांग बसलेले (डावीकडून) : व्ही. बी. बापट, वि. दा. सावरकर, बिडीकर, एस्. व्ही. बापट
दुसरी रांग खुर्चीत बसलेले (डावीकडून) : वझे, व्ही. व्ही. साठये, के. आर्. कानिटकर, जी. वाय म्हैसकर, पी. जी. गोखले, डी. एन्. आपटे.
तिसरी रांग उभे (डावीकडून) : आर्. के. लागू, के. जी. कुरणे, चक्रदेव, एन्. एल. रानडे, देव, एस्. जी. गोखले, डी. एन्. मेंगडे
चौथी रांग उभे (डावीकडून) : डी. के. परशुरामी, बी. जी. गोखले, व्ही. जे. गोखले, कोल्हटकर, जी. एस्. मराठे, आर. व्ही. दामले.

The Society entered into primary education by opening Navin Marathi Shala at Pune on Wednesday the 4th January 1899 as a feeder vernacular school attached to the New English School, Poona. Prof. Dhondo Keshav Karve was the first Superintendent of the school. The school remained at Nana Wada for quite some time.
The school was shifted to this building at Shaniwar Peth during the tenure of Principal K. R. Kanitkar.(Inset).



बुधवार दिनांक ४ जानेवारी १८९९ रोजी पुण्यात नवीन मराठी शाळेची स्थापना करून संस्थेने प्राथमिक शिक्षणक्षेत्रात प्रवेश केला.
स्थानिक भाषेत शिक्षण देणारी न्यू इंग्लिश स्कूलची पूरक शाळा असे याचे रूप होते. प्रा. धोंडो केशव कर्वे या शाळेचे पहिले सुपरिंटेन्डन्ट होते. नाना वाड्यातच या शाळेचे कामकाज सुरूवातीची अनेक वर्षे चालले. प्रा. के. रा. कानिटकर सुपरिंटेन्डन्ट असताना या छायाचित्रात दिसणाऱ्या इमारतीत शाळेचे स्थलांतर झाले.
आतल्या चौकटीत प्रा. के. रा. कानिटकर.

The opening of the D. E. Society's New English School, Satara on Wednesday the 6th December 1899 marked a distinct step in the expansion of the Society's activities outside Poona. This early photograph shows the school building against the backdrop of Fort Ajinkyatara. Guruvarya S. G. Devdhar (Inset). At present, this school has the largest student strength amongst the schools of the Society and has always maintained a high standard of education in the region.



साताऱ्यात ६ डिसेंबर १८९९ रोजी न्यू इंग्लिश स्कूल सुरू होण्याच्या रूपाने संस्थेच्या कामाचा विस्तार पुण्याबाहेर होण्याची महत्वाची घटना घडली. या जुन्या छायाचित्रात अजिंक्यतारा किल्ल्याच्या पार्श्वभूमीवर शाळेची इमारत दिसत आहे तर आतील चौकटीत गुरूवर्य सी. ग. देवधर आहेत. संस्थेच्या सर्व शाळांत सर्वाधिक विद्यार्थीसंख्या असणारी व उत्तम गुणवत्तेची शाळा असा या शाळेचा लौकीक आहे.

Wrangler Raghunath Purushottam Paranjpye was the first B. Sc. of Fergusson College (1894) and the first Indian Senior Wrangler at Cambridge. He became a Life Member of the Society in 1896 before proceeding for higher studies at Cambridge. On his return in 1902, in preference to many other more senior colleagues he was unanimously chosen as Principal of Fergusson College and led the college for nearly two decades to great success and prosperity.



रँग्लर र. पु. परांजप्ये हे फर्ग्युसन महाविद्यालयाचे पहिले बी. एस्सी. आणि केंब्रिजमध्ये पहिले भारतीय सीनियर रँग्लर होते. १९०२ मधे केंब्रिजहून परतल्यावर त्यांच्यापेक्षा ज्येष्ठ सहकाऱ्यांऐवजी त्यांनीच प्राचार्य व्हावे असा सर्वांनी एकमताने निर्णय केला. आणि नंतर जवळजवळ दोन दशके महाविद्यालयाला नेतृत्व देत त्यांनी यश व समृध्दी प्राप्त करून दिली.

The library of Rao Saheb Vishwanath Narayan Mandlik was presented by his son Shri. N. V. Mandlik to the Society in 1906. The library consists of about 8,800 volumes in the subjects of Sanskrit, Indian History, Politics, Hansard's Parliamentary debates etc. Honourable Rao Saheb was the first trustee of the Society.






CONTENTS.


| | Pages. |
|---|---|
| **English** | **1—17** |
| English Poetry | 1 |
| " Drama | 3 |
| " Prose... | 4 |
| " Fiction | 9 |
| " Biography | 12 |
| Religion and Mythology | 16 |
| Philology | 17 |
| Logic and Moral Philosophy | 18 |
| **History** | **20-43** |
| Ancient European History | 20 |
| Modern History of Europe | 21 |
| History of other countries | 24 |
| Indian History | 25 |
| Indian and other arts and antiquity | 38 |
| **Political Economy** | **44-47** |
| Politics and Political Economy | 44—47 |
| **Science** | **48-51** |
| Physical science | 48 |
| Natural science | 50 |
| Mathematics | 52 |
| Sports and country life | 53 |
| **School books** | **54-63** |
| School books—Poems | 57 |
| " " History | 58 |
| " " Geography | 59 |
| " " Science | 60 |
| " " Mathematics | 62 |
| " " Latin | 63 |
| " " Sanskrit | 64 |
| " " English grammar | 65 |
| **Reference** A ... | **66** |
| Parliamentary Reports B | 67 |


रावसाहेब वि. ना. मंडलीक यांची वैयक्तिक ग्रंथसंपदा त्यांचे पुत्र श्री. एन्. व्ही. मंडलीक यांनी १९०६ मध्ये संस्थेस प्रदान केली. या संग्रहात संस्कृत, भारताचा इतिहास, राज्यशास्त्र, हॅन्सार्डचा संसदीय वादविवाद इ. विषयावरील सुमारे ८,८०० ग्रंथांचा समावेश आहे. रावसाहेब मंडलीक आपल्या संस्थेचे पहिले विश्वस्त होते.

Life-Members have remained the soul and backbone of the Society, which is well known for being a teacher managed education society. This group photograph of Life-Members with recently retired Life-Member Gopal Krishna Gokhale belongs to October 1909. Seated from L to R: Front Row: Prof. W. B. Patwardhan, Prof. N. S. Panse, Prof. K. P. Limaye, Prof. G. V. Lele, Right Hon'ble G. K. Gokhale, Prof. C. G. Bhanu, Prof. D. K. Karve, Prof. S. G. Devdhar, Prof. V. K. Rajwade
Standing from L to R Back Row: Prof. G. B. Kolhatkar, Prof. P. D. Gune, Prof. V. B. Naik, Prof. K. N. Dravid, Wr. R. P. Paranjapye, Prof. H. G. Limaye, Prof. K. R. Kanitkar, Prof. V. G. Kale, Prof. G. C. Bhate, and Prof. D. L. Dixit.



शिक्षकांनी चालविलेल्या आपल्या विख्यात संस्थेचे, आजीव सदस्य जणू आत्मा आणि कणा बनून राहिले आहेत. ऑक्टोबर १९०९ च्या या समूहचित्रात तत्कालीन आजीव सदस्य, नुकतेच निवृत्त झालेले आजीव सदस्य प्रा. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या समवेत दिसत आहेत. बसलेले (डावीकडून): प्रा. वा. ब. पटवर्धन, प्रा. ना. स. पानसे, प्रा. कृ. पां. लिमये, प्रा. गं. वा. लेले, नेक नामदार गो. कृ. गोखले, प्रा. चिं. गं. भानू, प्रा. धों. के. कर्वे, प्रा. सी. ग. देवधर, प्रा. वै. का. राजवाडे.
पाठीमागे उभे(डावीकडून): प्रा. गो. बा. कोल्हटकर, प्रा. पां. दा. गुणे, प्रा. वि. बा. नाईक, प्रा. का. नी. द्रविड, रॅ. र. पु. परांजप्ये, प्रा. ह. गो. लिमये, प्रा. के. रा. कानिटकर, प्रा. वा. गो. काळे, प्रा. गो. चि. भाटे, प्रा. धुं. ल. दिक्षित.

The first instance of accommodation for lady students in the form of a Ladies' Hostel at Fergusson College became a reality in 1909, with the donation of Rs. 3,100 from Agarkar Memorial Committee. Two more blocks were added in due course of time viz. Kesarbai Block (in 1925) and Saraswati Quarters (in 1934). These blocks are now connected together by additional construction and together are now known as Agarkar Block of Ladies' Hostel and are seen in the second photograph.





फर्ग्युसन महाविद्यालयात १९०९ मध्ये मुलींसाठी प्रथमच वसतिगृहाची सोय उपलब्ध झाली. आगरकर स्मृति समितीच्या रू.३,३००च्या देणगीमुळे हे शक्य झाले. यथावकाश १९२५ मध्ये केसरबाई ब्लॉक व १९३४ मध्ये सरस्वती क्वार्टर्सच्या रूपाने त्यात भर पडली. पहिल्या छायाचित्रात या तीनही स्वतंत्र इमारती दिसताहेत तर दुसऱ्या छायाचित्रात या सर्व इमारती वाढीव बांधकाम करून जोडलेल्या दिसतात. आता एकत्रितरित्या या वसतिगृहास आगरकर ब्लॉक असे संबोधले जाते.

The pursuit of excellence was not restricted to mere academics. Sports were an important component and addition of a new support facility in the form of the Chandvadkar Pavilion and Bullel Gymnasium in 1908 at Fergusson College, was a significant milestone. The construction was done at a cost of Rs. 6000 largely funded out of the donations of Rs. 3000 and Rs. 2200 given respectively by Shrimant Trimbak Gopal Chandvadkar of Nasik and Dr. Bullel.



उत्तमतेचा ध्यास हा काही फक्त वर्गातले शिकवणे आणि ग्रंथांतील ज्ञान या पुरता मर्यादित नव्हता. खेळ हेही विद्यार्थी विकासाचे महत्वाचे अंग होते. फर्ग्युसन महाविद्यालयात चांदवडकर पॅव्हिलियन आणि डॉ. बळेल जिम्नॅशियम १९०८ मध्ये बांधून पूर्ण होणे हा एक महत्वाचा टप्पा होता. नाशिकचे श्रीमंत त्रिंबक गोपाळ चांदवडकर यांच्याकडून आलेले ३,००० रूपये आणि डॉ. बळेल यांचे २,२०० रूपये या देणग्यांतून बांधकामाच्या खर्चातला मोठा वाटा उचलला गेला.

# Deccan Education Society Pune

## 1909-1934

The idea of the Amphitheatre originated with Principal Paranjpye, who wanted to have a structure of semicircular shape like one of those he had seen at the Sorbonne. The N. M. Wadia Amphi Theatre of Fergusson College was constructed out of the munificent donation from N. M. Wadia Charities, H. H. The Aga Khan and others and was inaugurated on 5th September 1912.
Diwan Bahadur K. R. Godbole designed the building. This photograph belongs to the early days of the N. M. Wadia Amphi Theatre.
Inset : Shri. N. M. Wadia.



प्राचार्य र. पु. परांजप्ये यांनी सोरबोन येथे एक अर्धवर्तुळाकृती वास्तू पाहिली आणि तशी वास्तू आपल्या महाविद्यालयासाठी बांधावी असा विचार त्यांच्या मनात आला. अशा प्रकारे ॲम्फी थिएटरची कल्पना निघाली. दिवाण बहादूर गोडबोले यांनी प्रस्तावित इमारतीचे आरेखन केले आणि एन्. एम्. वाडिया चॅरिटीज, हिज हायनेस आगाखान वगैरे प्रभृतींच्या उदार देणगीतून फर्ग्युसन महाविद्यालयाचे एन्. एम्. वाडिया ॲम्फी थिएटर साकारले. या इमारतीचे हे सुरूवातीच्या काळातील छायाचित्र.
चौकटीत श्री. एन्. एम्. वाडिया.

In view of the introduction of practical Physics in the curriculum of the first year in Arts, the construction of Physics Laboratory was taken up in 1910 and completed in 1912 at a cost of Rs. 27,000/- at Fergusson College. Provision of well-equipped laboratories has always been given priority by the management of the Society.



बी. ए. च्या पहिल्या वर्षाच्या अभ्यासक्रमात प्रात्यक्षिकाचा समावेश झाल्याने १९१० मध्ये भौतिकशास्त्र प्रयोगशाळेचे काम हाती घेण्यात आले आणि २७,००० रूपये खर्चाचे हे काम १९१२ मध्ये फर्ग्युसन महाविद्यालयात पूर्ण झाले. उत्तम उपकरणांनी सुसज्ज अशा प्रयोगशाळा विद्यार्थ्यांना उपलब्ध करण्याला व्यवस्थापनाने नेहमीच प्राध्यान्य दिले आहे.

The importance given to sports by the Fergusson College is evident from the fact that a separate Gymkhana Managing Committee is appointed.
This photograph of the Committee in 1914 shows
(Sitting from L to R) Shri K. M. Chiplunkar, Prof. V. K. Joag, Prof. K. R. Kanitkar, Principal R. P. Paranjpye, Prof. W. B. Patwardhan, Prof. V. G. Kale and Shri. S. V. Sovani.



एका स्वतंत्र जिमखाना व्यवस्थापन समितीची नेमणूक फर्ग्युसन महाविद्यालयात क्रीडा विभागास दिले जाणारे महत्व स्पष्ट करते.
१९१४ सालातल्या समितीच्या या छायाचित्रात (डावीकडून) :
पुढील रांगेत बसलेले : श्री. के. एम्. चिपळूणकर, प्रा. वि. के. जोग, प्रा. के. रा. कानिटकर, प्राचार्य र. पु. परांजप्ये, प्रा. वा. ब. पटवर्धन, प्रा. वा. गो. काळे व श्री. एस्. व्ही. सोवनी दिसत आहेत.

On the front of primary education the Society had taken a great initiative by establishing the Navin Marathi Shala in 1899. The novel ideas employed in the instruction methods by Superintendent Prof. K. R. Kanitkar soon turned the school into a model to other institutions. The Educational Inspector in his report of 1919-20 says about the school and particularly about Prof. K. R. Kanitkar: "There is a great need for educational experiments in India, and this school shows what can be done by enterprise combined with knowledge. I hope that Prof Kanitkar will publish the reports of his experiments so that other schools may be profited by his enthusiastic work". The photograph shows a Gardening class in progress at Navin Marathi Shala, Pune."



१८९९ साली नवीन मराठी शाळा या नावाने प्राथमिक शाळा सुरू करून प्राथमिक शिक्षणात संस्थेने पदार्पण केले होते. शाळेचे सुपरिंटेंडन्ट या नात्याने प्रा. के. रा. कानिटकर यांनी (शिकवण्याच्या नावीन्यपूर्ण कल्पना) राबविल्या यामुळे शाळा एक उत्तम प्राथमिक शाळा म्हणून नावारूपाला आली आणि अन्य शाळांसाठी आदर्श ठरली. आपल्या १९१९-२० सालच्या अहवालात शिक्षण निरीक्षक म्हणतात, ''शैक्षणिक प्रयोगांची भारतात मोठीच गरज आहे. ज्ञान व उपक्रमशीलता एकत्रितरित्या काय करू शकते याचे ही शाळा उत्कृष्ट उदाहरण आहे. मी आशा करतो की प्रा. कानिटकर आपल्या प्रयोगांचे अहवाल प्रकाशित करून त्यांनी उत्साहाने केलेल्या कामाचा फायदा अन्य शाळांनाही करून देतील.'' छायाचित्रात अशा उपक्रमांपैकी असलेला बागकाम वर्ग दिसत आहे.

After its construction, the Amphitheatre soon became the place for conducting functions. The photograph shows a function going on in the N. M. Wadia Amphitheatre of Fergusson College in 1924.




बांधकाम पूर्ण होताच फर्ग्युसन महाविद्यालयात विविध कार्यक्रमांसाठी ॲम्फी थिएटर हे ठिकाण बनले.
येथे १९२४ मध्ये झालेल्या एका कार्यक्रमाचे छायाचित्र दिसत आहे.

On 22nd June 1919, the Willingdon College was declared open by Sir Chimanlal Setalwad, Vice-Chancellor of Mumbai University. The college was conducted at the 'buildings repaired and adapted to the use of the college by the Sangli Durbar' till it was shifted to the magnificent building seen in the photograph, on 8th August 1924.



मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू सर चिमणलाल सेटलवाड यांच्या हस्ते २२ जून १९१९ रोजी सांगली येथे विलिंग्डन महाविद्यालयाचे उद्घाटन झाले. सुरूवातीस महाविद्यालयाचे वर्ग सांगली संस्थानाने दुरूस्त करून वापरण्याजोग्या केलेल्या काही खोल्यांतून भरत होते. छायाचित्रात दिसणाऱ्या देखण्या वास्तूत ८ ऑगस्ट १९२४ रोजी स्थलांतर होईपर्यंत ही व्यवस्था होती.

"We hope that in the near future this new college will attain the position which the Fergusson College has come to occupy in the educational system of the presidency" so said the Secretary, DES on the occasion of inauguration of Willingdon College, Sangli, on 8th August 1924. The photograph shows form L to R (3) Principal G. C. Bhate of Willingdon College, (4) Sir Leslie Wilson, (5) H. H. Chhatrapati Rajaram Maharaj of Kolhapur, President of the Society (6) Chief of Phaltan and (7) Principal K. R. Kanitkar of Fergusson College.



८ ऑगस्ट १९२४ रोजी सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयाच्या नवीन इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी संस्थेच्या कार्यवाहांनी संस्थेच्या या नव्या महाविद्यालयाकडून असलेली अपेक्षा खालील शब्दात व्यक्त केली. ''फर्ग्युसन महाविद्यालयाने या संपूर्ण भागामध्ये जे स्थान मिळविले आहे तसे स्थान या नव्या महाविद्यालयाला नजीकच्या भविष्यकाळात प्राप्त होईल अशी आम्हास आशा आहे.'' या प्रसंगीच्या छायाचित्रात इमारतीच्या प्रवेश द्वारापाशी या प्रसंगीच्या छायाचित्रात इमारतीच्या प्रवेश द्वारापाशी (डावीकडून) (३) प्राचार्य गो. चि. भाटे, (४) सर लेस्ली विल्सन, (५) संस्थेचे अध्यक्ष हिज हायनेस कोल्हापूरचे राजाराम महाराज,(६) फलटण संस्थानचे प्रमुख आणि फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य के. रा. कानिटकर.

The demand for admission to the Fergusson College from the outstation students was ever increasing and additional residential accommodation was provided in 1925 by completing a block of rooms for students of communities backward in education, at Fergusson College. The ceremony for laying the cornerstone was held on 16th September 1924 at the hands of Sir Leslie Wilson, Governor of Bombay. The photograph shows Sir Leslie with Principal K. R. Kanitkar, other dignitaries and students. Around the same time Sir Leslie also paid a visit to the Navin Marathi Shala, Pune on 19th Sept 1924. In the photograph from L to R: Principal K. R. Kanitkar, Sir Leslie Wilson, Lady Wilson and Prof. V. K. Joag. Kanitkar-Joag was an industrious duo and was instrumental in starting many educational experiments and attracting donations to the Society.





बाहेरगावच्या विद्यार्थ्यांची फर्ग्युसन महाविद्यालयात वसतिगृहासाठीची मागणी लक्षात घेऊन १९२५ मध्ये एक ब्लॉक (चौथा ब्लॉक) शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांकरिता बांधला. १६ सप्टेंबर १९२४ रोजी या इमारतीची कोनशीला मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर लेस्ली विल्सन यांचे हस्ते बसविण्यात आली. छायाचित्रात सर लेस्ली प्राचार्य के. रा. कानिटकर आणि अन्य मान्यवर तसेच विद्यार्थ्यांसमवेत दिसत आहेत. याच सुमारास १९ सप्टेंबर १९२४ रोजी सर लेस्ली विल्सन व लेडी विल्सन यांनी नवीन मराठी शाळेस भेट दिली. छायाचित्रात(डावीकडून)प्राचार्य के. रा. कानिटकर, सर लेस्ली विल्सन, लेडी विल्सन आणि प्रा. वि. के. जोग. कानिटकर आणि जोग ही जोडी मोठी हिकमती होती आणि अनेक शैक्षणिक प्रयोग राबवतानाच संस्थेला देणग्या मिळवण्याचे यशस्वी प्रयत्नही त्यांनी केले.

Principal K. R. Kanitkar, Chief Guest Sir Leslie Wilson, Governor of Bombay, Wrangler Paranjpye, Principal K. R. Kanitkar and other dignitaries walk in procession towards the site of the planned hostel building (now more popularly known as Block IV) of Fergusson College.



प्रमुख पाहुणे सर लेस्ली विल्सन, रँग्लर र. पु. परांजप्ये, प्राचार्य के. रा. कानेटकर व अन्य मान्यवर प्रस्तावित वसतिगृहाच्या कोनशीला स्थापन करण्याच्या ठिकाणी जात असतानाचे हे छायाचित्र आता या वसतिगृहास ब्लॉक क्र. ४ म्हणून ओळखले जाते.

In April 1919 the Mavji Madhavji English School at Umbargaon was formally taken over from the local society. The school was situated in rural area and served the rural community, was bilingual and provided instruction in both Marathi and Gujarati. Seth Bhukandas Desai's exertions were instrumental in giving a start to this School at Umbergaon. The society managed the affairs of the school till handing it over to the local authorities after formation of separate states of Maharashtra and Gujrat in 1960.



उंबरगाव येथील मावजी माधवजी इंग्लिश स्कूल १९१९ च्या एप्रिल महिन्यात आपल्या संस्थेकडे तेथील स्थानिक संस्थेकडून घेण्यात आली. ग्रामीण भागात असणारी, उंबरगावला ही शाळा सुरू होण्यामागे शेठ भुकनदास देसाई यांचे प्रयत्न कारणीभूत होते. ग्रामीण जनतेसाठीची ही शाळा द्विभाषिक होती व मराठी व गुजराथी भाषेतून येथे शिक्षण दिले जात असे. महाराष्ट्र व गुजरात अशी दोन राज्ये स्थापन होईपर्यंत संस्थेने या शाळेचा कारभार पाहिला आणि मग स्थानिकांकडे या शाळेचे हस्तांतरण झाले.

After the First World War, the British Government introduced military training as an optional subject for the college students. The first Bombay Battalion UTC was started in Fergusson College and its first parade took place on the Fergusson College grounds on 5th August 1921. The photograph belongs to '1930-31 platoon A Coy'. Most interesting feature of this photograph is Mr. S. V. Kogekar standing at the centre of the last row, who later on became the Principal of the college.



पहिल्या महायुध्दानंतर ब्रिटिश शासनाने सैनिकी प्रशिक्षण एक ऐच्छिक विषय म्हणून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शिकण्याची व्यवस्था केली. पहिली बॉम्बे बटालियन यूटीसी फर्ग्युसन महाविद्यालयात सुरू होऊन ५ ऑगस्ट १९२१ रोजी या बटालियनची पहिली परेड महाविद्यालयाच्या मैदानावर झाली. हे छायाचित्र '१९३०-३१ प्लॅटून अे कंपनी' चे आहे.
या चित्रातील विशेष गोष्ट म्हणजे शेवटच्या रांगेतील मध्ये असलेले श्री. स. वा. कोगेकर, जे नंतर फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य झाले.

With the generous help of donors like Sir Dorabji Tata, Sir C. N. Wadia, Shri Ratan Tata, Raja Pratapgirji Narasinghgirji and others, the Drill and Assembly Hall for the school was constructed at Navin Marathi Shala, Pune and was opened at the hands of Lady Tata on 17th October 1926. The photograph shows students in an assembly in the open ground with the drill hall in the background.



सर दोराबजी टाटा, सर सी. एन्. वाडिया, राजा प्रतापगिरजी नरसिंगगिरजी आणि इतर उदार देणगीदारांच्या देणगीतून नवीन मराठी शाळेचे सामूहिक कवायत सभागृह बांधले. १७ ऑक्टोबर १९२६ रोजी लेडी टाटा यांच्या हस्ते या सभागृहाचे उद्घाटन झाले. शाळेची मुख्य इमारत व कवायतगृहाच्या मधील मैदानात मुलांची कवायत चालू असल्याने या छायाचित्रात दिसते. मुलांच्या मागे कवायतगृहाची डौलदार इमारत.

Prof. V. K. Joag convinced Wadia brothers to visit Fergusson College. Following this visit in 1927, a donation of Rs. 1.61 lakhs was received from them. Prof. Joag's role was instrumental in securing the donation. This amount met the entire cost of the Bai Jerbai Wadia Library Building of Fergusson College. The photograph of 7th December 1928 shows the building nearing completion. Principal V. K. Joag was felicitated in the Fergusson College many years later. The accompanying photograph taken at the entrance of B J Wadia Library on the occasion shows in the last row from L to R: Prof. N. V. Vaidya, Prof. P. R. Damle; In the centre row: Principal Dr. D. D. Karve, Principal V. K. Joag, Prof. Hulyalkar; In front row: Prof N. G. Suru, Prof. D. D. Wadekar.






प्रा. वि. के. जोग यांच्या विनंतीमुळे वाडिया बंधूंनी फर्ग्युसन महाविद्यालयास भेट दिली. १९२७ मधील या भेटीचे पर्यवसान १ लाख एकसष्ठ हजार रूपयांची देणगी मिळण्यात झाले. ही देणगी मिळविण्याचे बहुतांश श्रेय प्रा. जोग यांचेकडे जाते. या रकमेतून फर्ग्युसन महाविद्यालयाच्या बाई जेरबाई वाडिया ग्रंथालयाचे सर्व बांधकाम पूर्ण झाले. ७ डिसेंबर १९२८ च्या या छायाचित्रात बांधकाम जवळपास पूर्ण होत आलेली इमारत दिसत आहे. प्राचार्य वि. के. जोगांचा नंतर बऱ्याच वर्षांनी फर्ग्युसन महाविद्यालयात सत्कार झाला.

वाडिया ग्रंथालयाच्या प्रवेशद्वारापाशी घेतलेल्या सोबतच्या छायाचित्रात मागील रांगेत (डावीकडून) : प्रा. ना. वि. वैद्य, प्रा. प्र. रा. दामले मधील रांगेत (डावीकडून) : प्राचार्य दि. धों. कर्वे, प्राचार्य वि. के. जोग, प्रा. हुल्याळकर पुढील रांगेत (डावीकडून) : प्रा. न. गो. सुरू व प्रा. दे. द. वाडेकर दिसत आहेत.

The B. J. Wadia Library building was completed on 25th May 1929. The photograph shows the completed building. The library has a collection of over 2 lakh books – including some very old and rare books. The spacious reading hall is a great convenience to the students and pride of the B. J. Wadia Library.



बाई जेरबाई वाडिया ग्रंथालयाचे काम २५ मे १९२९ रोजी पूर्ण झाले. पूर्ण झालेल्या या इमारतीचे हे छायाचित्र. या ग्रंथालयात दुर्मिळ आणि नवीन अशी सगळी मिळून दोन लाखाच्या घरात पुस्तके आहेत. इथले प्रशस्त अभ्यासगृह या ग्रंथालयाचे भूषण आहे व यामुळे विद्यार्थ्यांची मोठीच सोय होते.

The Second President of the Society
Lt. Col. His Highness Sir Rajaram
Chhatrapati, Maharaja of Kolhapur
1922 to 1942



संस्थेचे द्वितीय अध्यक्ष
लेफ्ट. कर्नल हिज हायनेस सर राजाराम
छत्रपती, कोल्हापूरचे महाराज
१९२२ ते १९४२

The demand for admission to the Willingdon College from the outstation students was also increasing and residential accommodation was provided in June 1927 by constructing hostel with accomodation for 90 students. His Highness Shrimant Chhatrapati Rajaram Maharaj of Kolhapur gave a generous donation of Rs 30,000 for this purpose. The "H. H. Shahu Chhatrapati Maharaja of Kolhapur Hostel for the Willingdon College" was inaugurated by the Education Minister, Diwan Bahadur Harilal Desai.




सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयातही बाहेरगावच्या विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी मागणी वाढत होती. ९० विद्यार्थ्यांची सोय करणारे वसतीगृह जून १९२७ मध्ये बांधून पूर्ण झाले आणि या मागणीची पूर्तता झाली. कोल्हापूरचे हिज हायनेस श्रीमंत छत्रपती राजाराम महाराज यांनी यासाठी ३०,००० रूपयांची उदार देणगी दिली.

हिज हायनेस शाहू छत्रपती वसतीगृह असे नामकरण केलेल्या या वसतिगृहाचे उद्घाटन शिक्षणमंत्री दिवाणबहादूर हरिलाल देसाई यांचे हस्ते झाले.

At the request of the Marathi Vidyotejak Mandali of Wai, the D. E. society had been managing the Dravid High School ever since 1911 as an affiliated institution. Dravid brothers generously donated a sum of Rs. 30,000 as also the Raste Wada in 1925 and after completing the legal procedures in December 1933, the Dravid High School of Wai was formally incorporated as an institution of the Society.




वाई गावच्या 'मराठी विद्योत्तेजक मंडळी'च्या विनंतीवरून १९११ पासून द्रविड हायस्कूलचे व्यवस्थापन डेक्कन एज्युकेशन सोसायटीकडे होते.
वाईच्याच द्रविड बंधूंनी १९२५ मध्ये रास्तेवाडा व तीस हजार रूपयांची देणगी या शाळेसाठी दिली.
आवश्यक कायदेशीर बाबींची केल्यानंतर पूर्तता १९३३ मध्ये ही शाळा पूर्णत्वाने संस्थेची शाळा झाली.



The golden Jubilee of the Society was celebrated in 1935, when Sir C. V. Raman was the Chief Guest. While no photographs of the function could be found, messages from illustrious personalities make up for it to a great extent.
"Who can fail to be enthused over the noble record of the service rendered by the D. E. Society and the Fergusson College to the cause of education? …"
-Message received from Mahatma Gandhi on the occasion of Golden Jubilee in 1935.



17

Dear Friend,

Who can fail to be enthused over the noble record of the service rendered by the D.E. Society and the Fergusson College to the cause of education? I wish the forthcoming function every success.

This is all I have the time to send you.

Wardha
27-3-35

Yours sincly,
M.K. Gandhi

१९३५ मध्ये सर चंद्रशेखर व्यंकट रामन यांच्या प्रमुख उपस्थितीत संस्थेचा सुवर्णमहोत्सव साजरा झाला. या समारंभाची छायाचित्रे जरी मिळाली नाहीत तरी त्याची भरपाई त्यावेळी आलेल्या थोरा मोठ्यांच्या संदेशांच्या छायाचित्रांच्या रूपाने करायचा प्रयत्न आहे. संस्थेच्या सुवर्णमहोत्सवाच्या वेळी पाठविलेल्या संदेशात महात्मा गांधी म्हणतात,
' डे. ए. सोसायटी आणि फर्ग्युसन महाविद्यालयाने शिक्षणक्षेत्रासाठी केलेल्या योगदानाचा उदात्त इतिहास कोणास प्रभावित करणार नाही? '



“I hope that the students will maintain the high traditions of the Institution and devote their lives for serving the highest interest not only of Maharashtra but of India as a whole.”

- Message received from Sir J. C. Bose at the time of Golden Jubilee in 1935.



BOSE INSTITUTE

Director : SIR J. C. BOSE, F.R.S.
Tel. Address—BOSTUTE.
Telephone No. 1309 Barabazar.

93, UPPER CIRCULAR ROAD

Calcutta, the 7th April, 1935

21

Dear Sir,

On the occasion of the Golden Jubilee Celebration, I send my best wishes for the continued prosperity of the Fergusson College and of Deccan Education Society. During my last visit to the Fergusson College I was greatly impressed by the earnestness of both the men and women students to acquire knowledge. I hope that the students will maintain the high traditions of the Institution and devote their lives for serving the highest interest not only of Maharashta but of India as a whole.

Yours Sincerely

J. C. Bose

The Principal,
Fergusson College,
Poona.

१९३५ मध्ये संस्थेच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त पाठविलेल्या संदेशात सर जगदीशचंद्र बोस म्हणतात: ‘ मला आशा आहे की येथील विद्यार्थी आपल्या संस्थेच्या उच्च परंपरा कायम राखतील आणि फक्त महाराष्ट्राच्या नव्हे तर संपूर्ण भारताच्या सेवेसाठी स्वत:ला वाहून घेतील.’



"... It may be confidently expected that with the growth of years, they will exercise an ever-widening influence on the culture, capacity and prosperity of the people of Poona and the Deccan generally"
Message received from Sir M. Visvesvaraya at the time of Golden Jubilee in 1935.



Permanent Address :-
SIR M. VISVESVARAYA, K.C.I.E.,
Uplands, High Ground,
BANGALORE, India.

4

46 F. Warden Road,
Bombay, 20th April 1935

Dear Sir,

I wish to be permitted to convey to the Governing Authorities of the Deccan Education Society and the Ferguson College, Poona, on the occasion of the celebration of their Golden Jubilee, my warm felicitations on the great service they have done and are doing to the cause of education in the Maharashtra country.

It may be confidently expected that with the growth of years, they will exercise an ever-widening influence on the culture, capacity and prosperity of the people of Poona and the Deccan generally.

Yours sincerely,
M. Visvesvaraya

G. Mahajani, Esq.,
Principal, Ferguson College, Poona
and Secretary, Governing Body,
Deccan Education Society,
Poona.

संस्थेच्या सुवर्णमहोत्सवप्रसंगी सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या आपल्या संदेशात म्हणतात:
'' जसजसा काळ पुढे सरकेल तसतसा पुणे आणि एकूणात दख्खन प्रदेशातील लोकांची सांस्कृतिक जडणघडण, क्षमता आणि सुबत्तेवर त्यांचा (संस्थेचा) अधिकाधिक व्यापक प्रभाव पडेल.''

Around the same time some Life Members - Prof. V. K. Joag (in the first photograph on right), Prof Suru, Prof Khadye - left the society under peculiar circumstances and went on to form Modern Education Society, which runs the Nowrosjee Wadia College, the Ness Wadia College of Commerce and other colleges. Prof S. R. Kanitkar (in the second photograph) opted for retirement one year ahead of his stipulated period of service and formed the Progressive Education Society which runs the Modern High School and the Modern College amongst many other institutes. Thus the Life Members of the Society continued with the tradition set by the great Gopal Krishna Gokhale who had formed the Servants of India Society after his retirement and Maharshi Dhondo Keshav Karve, the Hingane Stree Shikshan Samstha.





साधारणत: याच सुमारास एका विशिष्ट परिस्थितीत संस्थेचे काही आजीव सदस्य जसे की, प्रा. वि. के. जोग (उजवीकडून पहिले छायाचित्र) प्रा. सुरू, प्रा. खाड्ये संस्थेतून बाहेर पडले व त्यांनी नौरोसजी वाडिया महाविद्यालय व अन्य महाविद्यालये चालवणाऱ्या मॉडर्न एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. दुसरे आजीव सदस्य प्रा. शं. रा. कानिटकर (दुसरे छायाचित्र) यांनी नियत निवृत्ती वर्षाच्या एक वर्ष आधीच निवृत्ती स्वीकारली आणि मॉडर्न महाविद्यालय, मॉडर्न हायस्कूल चालविणाऱ्या प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. अशा प्रकारे निवृत्तीनंतर हिंद सेवक समाजाची स्थापना करणाऱ्या नामदार गोपाळ कृष्ण गोखले किंवा हिंगणे स्त्री शिक्षण संस्था स्थापन करणाऱ्या महर्षी धोंडो केशव कर्वे यांची परंपरा संस्थेच्या या आजीव सदस्यांनी पुढे चालविली.

# Deccan Education Society Pune

1934-1959

The great event of the Golden Jubilee of Fergusson College was signalized by one important step in the progress of education, in that the Society decided to enter the field of technical education and added in 1937 to its existing institutions giving liberal education, a Technical Institute for paints and varnishes. Accompanying photograph shows the workshop building of the institute. The second photograph shows the interior.





फर्ग्युसन महाविद्यालयाच्या महत्वाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात संस्थेने शिक्षणाच्या प्रगतीबाबतचे एक महत्वाचे पाऊल उचलले ते म्हणजे मनोविकासी शिक्षण देणाऱ्या आपल्या घटकसंस्थाच्या बरोबरीने १९३७ साली सुरू केलेली रंग व झिलई विषयातील टेक्निकल इन्स्टिट्यूटची स्थापना. सोबतच्या छायाचित्रात या संस्थेच्या कार्यशाळेची इमारत आहे आणि दुसऱ्या चित्रात या कार्यशाळेचे अंतरंग दिसते.

This aerial photograph in late thirties shows Fergusson College campus with hardly any habitation around. The lone building of Technical Institute Workshop is seen at extreme left end of the campus. On the open piece of land around the Technical Institute we now have the Institute of Management Development and Research (IMDR) and the Jagannath Rathi Vocational Guidance and Training Institute (JRVGTI).



या विहंगम दृश्यात फर्ग्युसन महाविद्यालय परिसराभोवती तुरळक वस्ती दिसते. टेक्निकल इन्स्टिटस्ट्यूटच्या कार्यशाळेची एकुलती एक इमारत परिसराच्या डावीकडच्या टोकास दिसते. आता या चित्रात दिसणाऱ्या टेक्निकल इन्स्टिटस्ट्यूट भोवतालच्या मोकळ्या जागेत एका बाजूला इन्स्टिटस्ट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट ॲन्ड रिसर्च (आय्. एम्. डी. आर्.) आहे तर दुसऱ्या बाजूस जगन्नाथ राठी व्होकेशनल गाइडन्स ॲन्ड ट्रेनिंग इन्स्टिटस्ट्यूट आहे.

This photograph of the Managing Committee of Annual Social Gathering 1938 at Willingdon College shows from L to R: Mr. A. V. Khadilkar, Mr. B. R. Hulle (General Secretary), Prof. V. V. Ketkar (Chairman), Prin. D. G. Karve, Mr. Gangadharrao Deshpande, Hon. Mr. B. G. Kher, Premier of Bombay (Chief Guest), Hon. Mr. Latthe, Mr. B. S. Kamat(Chairman of the Council of the Society), Mr. Patil, Mr. A. T. Patil, Mr. R. B. Manohar



१९३८ सालच्या विलिंग्डन महाविद्यालयाच्या विद्यार्थी स्नेहसंमेलनाच्या समितीत डावीकडून : श्री. ए. व्ही. खाडिलकर, श्री. बी. आर्. हुल्ले (जनरल सेक्रेटरी) प्रा. वि. वि. केतकर (अध्यक्ष), प्राचार्य द. गो. कर्वे, श्री. गंगाधरराव देशपांडे, मा. बा. गं. खेर, मुंबई राज्याचे मुख्यमंत्री (प्रमुख पाहुणे), मा. श्री. लठ्ठे, श्री. बा. सि. कामत (संस्थेच्या परिषदेचे अध्यक्ष), श्री. पाटील, श्री. ए. टी. पाटील, श्री. आर्. बी. मनोहर.

In Navin Marathi Shala around 1930 a small shed was constructed for the students through a donation by Seth Jeevandas Vallabhdas to provide a place to comfortably eat their Tiffin, but as it became insufficient a new shed, seen in the photograph, was constructed in 1938 with a donation given by Shri Sardar Thube. The second photograph shows Maharaja Sayajirao Gaekwar Memorial Hall for Students' Library constructed in 1941.





शेठ जीवनदास वल्लभदास यांच्या देणगीतून मुलांना डबा खाण्यासाठी एक शेड पुण्याच्या नवीन मराठी शाळेत १९३० मध्ये बांधली.
ही शेड अपुरी पडू लागल्याने १९३८ मध्ये सरदार ठुबे यांच्या देणगीतून छायाचित्रात दिसणारी नवी शेड बांधली.
दुसऱ्या छायाचित्रामध्ये (१९४१ साली तयार झालेला) श्रीमंत सर सयाजीराव गायकवाड विद्यार्थी लायब्ररी हॉल दिसत आहे.



The great poet Ravindranath Tagore says in his letter (20th July 1938) of acknowledgement of receipt of the copy of the History of the Deccan Education Society "...The book will be placed in our library so that the glorious record of the D. E. Society may inspire our own workers here in their educational work."



"Uttarayan"
Santiniketan, Bengal.

Date 615
26-7-38

July 20, 1938.

Dear Prof. Limaye,

I thank you for your kindness in sending me a copy of the History of the Deccan Education Society which you have compiled on behalf of your organisation. The book will be placed in our Library so that the glorious record of the D.E.Society may inspire our own workers here in their educational work.

With kind regards,

Yours sincerely,

Rabindranath Tagore

Prof. P. M. Limaye,
Fergusson College,
Poona.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या इतिहासाची प्रत मिळाल्यावर थोर कवि रवींद्रनाथ टागोर हे आपल्या २० जुलै १९३८ रोजी पाठविलेल्या उत्तराच्या पत्रात लिहितात, ''हे पुस्तक आम्ही आमच्या ग्रंथालयात ठेवू ज्या योगे डे. ए. सोसायटीचा हा वैभवशाली इतिहास आमच्या कार्यकर्त्यांना त्यांच्या शिक्षणविषयक कार्यास प्रेरणादायी होईल.''

The Silver Jubilee of Philosophical Association of Fergusson College was celebrated in 1941.
In the photograph from L to R: Mrs. Natu, Dr. Mrs. Irawati Karve, Prof. D. D. Vadekar, Prof. P. B. Sathaye, Prof. N. G. Damle, Prin. G. C. Bhate, Sir S. Radhakrishnan, Dr. R. P. Paranjapye, M. G. Shah, Prof. Kothurkar, G. K. Kelkar, S. V. Damle, M. D. Vidwans.




फर्ग्युसन महाविद्यालयाच्या फिलॉसॉफीकल असोसिएशनची रौप्य महोत्सव १९४१ मध्ये साजरा झाला. या वेळच्या छायाचित्रात (डावीकडून): श्रीमती नातू, डॉ. श्रीमती इरावती कर्वे, प्रा. दे. द. वाडेकर, प्रा. प. भि. साठये, प्रा. न. ग. दामले, प्रा. गो. चि. भाटे, सर सर्वपल्ली राधाकृष्णन, डॉ. र. पु. परांजप्ये, एम्. जी. शाह, प्रा. कोठुरकर, जी. के. केळकर, एस्. व्ही. दामले, एम्. डी. विद्वांस.

This group photograph of Life-Members was taken in 1942 when the number had risen from 18 in 1909 to 35. Interestingly, the photographer, a past student himself Mr. W. N. Bhat later contributed in starting a course in photography at Fergusson College in 1983.

In the photograph are seen from L to R :

First Row (sitting) : Prof. K. G. Pandit, Prof P. B. Sathaye, Prof. C. R. Devdhar, Prof P. M. Limaye, Prof. R. P. Shintre, Dr. P. V. Bapat, Dr. V. G. Paranjape, Prof. G. B. Kolhatkar, Prof. V. N. Kumbhare, Prof. V. A. Apte, Prof. N. G. Damle, Prof. R. N. Joshi, Prin. Dr. G. S. Mahajani, Prof. D. G. Karve, Dr. D. D. Karve

Second Row (standing) : Prof. R. S. Mugali, Prof. M. G. Bhate, Prof. R. S. Joag, Prin. V. K. Gokak, Prof. M. V. Patwardhan, Prof. K. V. Kelkar, Prof. R. V. Barave, Prof. S. R. Parasnis, Dr. V. V. Gokhale, Prof. D. D. Vadekar, Prof. S. R. Sharma, Dr. R. N. Dandekar, Prof. V. V. Apte, Prof. D. G. Dhavale

Third Row (standing) : Prof. T. M. Joshi, Prof. N. V. Vaidya, Prof. P. N. Virkar, Prof. V. V. Ketkar, Prof. S. V. Kogekar, Prof. G. L. Chandratreya



सन १९४२ मध्ये काढलेल्या या आजीव सदस्यांच्या समूह छायाचित्रात आजीव सदस्यांची संख्या ३५ वर पोचलेली दिसते. १९०९ मध्ये हीच संख्या १८ होती. आणखी एक गोष्ट म्हणजे याचे छायाचित्रकार श्री. वा. ना. भट हे संस्थेचे माजी विद्यार्थी होते आणि नंतर १९८३ मध्ये फर्ग्युसन महाविद्यालयात सुरू केलेल्या छायाचित्रणकलेच्या अभ्यासक्रमात एक ख्यातनाम छायाचित्रकार मार्गदर्शक म्हणून ते सहभागी झाले.

छायाचित्रात पहिली रांग बसलेले (डावीकडून) प्रा. के. गो. पंडित, प्रा. प. भि. साठये, प्रा. चिं. रा. देवधर, प्रा. प. म. लिमये, प्रा. रा. पु. शिंत्रे, डॉ. पु. वि. बापट, प्रा. वा. गो. परांजपे, प्रा. गो. बा. कोल्हटकर, प्रा. वि. ना. कुंभारे, प्रा. वि. आ. आपटे, प्रा. न. ग. दामले, प्रा. रा. ना. जोशी, प्राचार्य डॉ. ग. स. महाजनी, प्रा. द. गो. कर्वे, डॉ. दि. धों. कर्वे,

दुसरी रांग उभे (डावीकडून) प्रा. रं. श्री. मुगळी, प्रा. म. गो. भाटे, प्रा. रा. श्री. जोग, प्रा. वि. कृ. गोकाक, प्रा. मा. वा. पटवर्धन, प्रा. क. वा. केळकर, प्रा. र. वि. बर्वे, प्रा. श्री. रा. पारसनीस, प्रा. वा. वि. गोखले, प्रा. दे. द. वाडेकर, प्रा. श्री. रा. शर्मा, डॉ. रा. ना. दांडेकर, प्रा. वि. वि. आपटे, प्रा. दा. गो. ढवळे.

तिसरी रांग(डावीकडून) : प्रा. त्र्यं. म. जोशी, प्रा. एन्. व्ही. वैद्य, प्रा. पी. एन्. वीरकर, प्रा. वि. वि. केतकर, प्रा. स. वा. कोगेकर, प्रा. गो. ल. चंद्रात्रेय.

With a view to carrying forward the process of reorientation of education, the society started the College of Commerce. Initially, the college was conducted in the Amphi Theatre of Fergusson College. The inauguration took place on 24th July 1943 at the hands of Sir Ardeshir Dalal, representative of the house of Tatas. The College was named as Brihan Maharashtra College of Commerce in recognition of the donation by Brihan Maharashtra Sugar Syndicate on 11th November 1944 at the hands of Sir C. D. Deshmukh. In the photograph are seen from L to R : Dr. Dhanjayrao Gadgil, Prof. S. V. Kogekar, Sir C. D. Deshmukh, Prof. V. G. Kale, Shri Vaikunthbhai Mehta and Principal D. G. Karve (extreme right)



शिक्षणक्षेत्रास नवी दिशा देण्याचे काम पुढे नेत संस्थेने वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना केली. सुरूवातीस हे महाविद्यालय फर्ग्युसन महाविद्यालयाच्या अँफी थिएटर इमारतीत भरत होते. २४ जुलै १९४३ रोजी टाटा उद्योगसमूहाचे प्रतिनिधी सर अर्देशीर दलाल यांचे हस्ते महाविद्यालयाचे उद्घाटन झाले, आणि ११ नोव्हेंबर १९४४ रोजी ''बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय'' असे नामकरण सर चिं. द्वा. देशमुख यांचे हस्ते झाले.
छायाचित्रात (डावीकडून) : डॉ. धनंजयराव गाडगीळ, प्रा. स. वा. कोगेकर, सर चिं. द्वा. देशमुख, प्रा. वा. गो. काळे, श्री. वैकुंठभाई मेहता, आणि प्राचार्य द. गो. कर्वे.

The third President of the Society
Her Highness Shrimati Tarabai Maharaj, Senior Maharani Saheb of Kolhapur
1942 to 1947



संस्थेच्या तृतीय अध्यक्षा
हर हायनेस श्रीमती ताराबाई महाराज, कोल्हापूरच्या ज्येष्ठ महाराणी साहेब
१९४२ ते १९४७



The Society celebrated its Diamond Jubilee in 1945. Amongst the messages received on the occasion was this message from Mahatma Gandhi, addressed to Prin. Mahajani. While reiterating the views expressed in his earlier letter of 1935, Gandhiji wishes that the Society keeps growing.



1555
19-10-45

पूना २०-१०-४५

भाई महाजनी,

आपका १२ तारीख का पत्र आज ही मिला है। आपको जो संदेश मैंने १९३५ में भेजा था उसी आज भी दोहराता हूं और आशा रखता हूं कि दानों संस्था की आयु बढ़ती ही रहे।

आपका,
मो. क. गांधी

१९४५ साली संस्थेचा हीरक महोत्सव साजरा झाला. प्राचार्य महाजनी यांना पाठविलेल्या संदेशात महात्मा गांधी यांचा हा संदेश आहे. गांधीजींनी आपल्या १९३५ मध्ये पाठविलेल्या पूर्वीच्या पत्रातल्या मुद्यांना दुजोरा देत संस्थेची भरभराट होवो अशा शुभेच्छा दिल्या आहेत.



Pandit Jawaharlal Nehru says in his message sent at the time of the Diamond Jubilee in 1945: "... The Society and the College have, in their unobtrusive way, probably helped to mould the India of today far more than most people realize..."

Anand Bhawan
Allahabad, October 16, 1945

Dear Mr.Mahajani,

I gladly send you my good wishes on the occasion of the Diamond Jubilee celebration of the Deccan Education Society and the Fergusson College. The Society and the College have, in their unobtrusive way, probably helped to mould the India of today far more than most people realise. With their ideal of selfless service they have sent out famous men and many others not famous but none the less good workers for India's freedom and progress. So on this occasion of your celebrating your Diamond Jubilee I join with innumerable other persons to wish you xxxxx ever larger opportunities of training the youth of India and of preparing true citizens of a free India.

Yours sincerely,

Jawaharlal Nehru

Principal G.S.Mahajani,
Fergusson College,
Poona 4

१९४५ च्या हीरकमहोत्सवानिमित्त पाठवलेल्या संदेशात पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात ''गाजावाजा न करता कार्य करण्याच्या आपल्या पध्दतीने संस्था व महाविद्यालयाने आजचा भारत घडविण्याच्यासाठी जे कार्य केले आहे ते एकंदरीत लोक समजतात त्यापेक्षा फार मोठे आहे.''



"... I have no doubt that the college has a great career ahead of it." Message received from Sir S. Radhakrishnan, Vice Chancellor of Benares Hindu University, at the time of Diamond Jubilee in 1945.



Sir S. Radhakrishnan

Vice-Chancellor — BENARES HINDU UNIVERSITY

10th November 45.

My dear Mahajani,

Yours of the 24th October, for which many thanks.

I am exceedingly glad to know that your great institution will be celebrating its Diamond Jubilee under the Presidentship of our veteran scholar,-lawyer,-statesman, Rt. Hon'ble Sir Tej Bahadur Sapru. I have no doubt that the College has a great career ahead of it.

With best regards,

Yours sincerely,

Principal G.S. Mahajani,
Fergusson College,
Poona, 4.

15/11/45

हीरक महोत्सवाचे वेळी बनारस हिंदू विद्यापीठाचे कुलगुरू सर सर्वपल्ली राधाकृष्णन आपल्या संदेशात म्हणतात ''या महाविद्यालयाच्या उज्वल भवितव्याविषयी मला किंचितही शंका नाही.''

On the occasion of Diamond Jubilee of Fergusson College the Old Fergussonian Association was formed in the programmes held on 17th and 18th November 1945. Left to right in chairs 1) Dr. Mrs. Kamalabai Chitale, 2) Prin. Dr. G. S. Mahajani, 3) Mr. N. C. Kelkar (President of the Past-Students' Meeting), 4) Sir Tej Bahadur Sapru (Chief Guest), 5) Dr. D. K. Karve, 6) Rao Saheb N. D. Abhyankar (Chairman) and 7) Mr. N. D. Sathe



फर्ग्युसन महाविद्यालयाच्या हीरक महोत्सवानिमित्त १७ व १८ नोव्हेंबर १९४५ रोजी झालेल्या कार्यक्रमांत माजी विद्यार्थ्यांच्या 'ओल्ड फर्ग्युसोनियन असोसिएशन'ची स्थापना झाली. छायाचित्रात खुर्चीत बसलेले (डावीकडून): डॉ. कमलाबाई चितळे, प्राचार्य डॉ. ग. स. महाजनी, श्री. न. चिं. केळकर (माजी विद्यार्थी संमेलनाचे अध्यक्ष) प्रमुख पाहुणे सर तेजबहादूर सप्रू, डॉ. धों. के. कर्वे, रावसाहेब एन्. डी. अभ्यंकर (अध्यक्ष) आणि श्री. एन्. डी. साठे.

Justice Mahadeo Govind Ranade was the philosopher, friend and guide of the Society since its formation. Dr. N. M. Ranade, the adopted son of Justice Ranade donated Rs. 1, 00,000/- This facilitated separation of pre-primary classes from Navin Marathi Shala, to start an independent pre-primary school in 1950 : Nyaymurti Ranade Balak Mandir.



संस्थेच्या स्थापनेपासूनच न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे संस्थेचे तत्वज्ञ, मित्र व मार्गदर्शक होते. न्यायमूर्ती रानडे यांचे दत्तक पुत्र डॉ. ना. म. रानडे यांनी संस्थेस एक लक्ष रूपयांची देणगी दिली. नवीन मराठी शाळेतून पूर्व प्राथमिक वर्ग स्वतंत्र करून पूर्व प्राथमिक शाळेत रूपांतर करणे १९५० मध्ये यामुळे शक्य झाले. ही शाळा म्हणजेच न्यायमूर्ती रानडे बालकमंदिर, पुणे.

Dr. John Mathai, former Finance Minister and Chairman of the Dorab Tata Trust, laid the foundation stone of the Brihan Maharashtra College of Commerce on 26th May 1951. In the photograph are seen from L to R: Prof. V. P. Shintre, Prin. T. M. Joshi, Dr. John Mathai, Mrs. Mathai, Prof M. R. Dhekney, Prof. S. S. Murdeshwar, Shri R. D. Khaniwale (with umbrella) and others.




बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीची कोनशिला २६ मे १९५१ रोजी माजी अर्थमंत्री आणि दोराब टाटा ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. जॉन मथाई यांचे हस्ते बसविण्यात आली. या प्रसंगीच्या छायाचित्रात (डावीकडून) : प्रा. व्ही. पी. शिंत्रे, प्राचार्य त्र्यं. म. जोशी, डॉ. जॉन मथाई, प्रा. एम्. आर्. ढेकणे, प्रा. एस्. एम्. मुर्डेश्वर, श्री. आर्. डी. खाणीवाले व अन्य मंडळी दिसत आहेत.

The completed new building of the Brihan
Maharashtra College of Commerce,
Pune was a single storey structure. The building was
completed to the present level in 1961
(Second Photograph)





बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाची पहिल्या टप्प्याचे बांधकाम पूर्ण झाल्यावर
एक मजली मुख्य इमारत पहिल्या छायाचित्रात
तर १९६१ मध्ये आता दिसते तशी पूर्ण झाल्यानंतरचे इमारतीचे रूप
दुसऱ्या छायाचित्रात दिसत आहे.

The tireless efforts of Principal G. C. Bhate, the first Principal of the College, had established the Willingdon College as a leading college in that part of the state. The college celebrated its Silver Jubilee in 1944. The photograph shows the majestic view of the Main Building quadrangle and the open air theatre stage. Inset: Principal G. C. Bhate



प्राचार्य गो. चि. भाटे यांच्या अथक परिश्रमांतून विलिंग्डन महाविद्यालय राज्याच्या त्या भागातले एक आघाडीचे महाविद्यालय म्हणून नावारूपाला आले. १९४४ मध्ये या महाविद्यालयाने आपला रौप्यमहोत्सव साजरा केला. छायाचित्रात मुख्य इमारतीच्या आतले सुरेख पटांगण व खुले सभागृह दिसत आहे. आत चौकटीत प्राचार्य गो. चि. भाटे.

In 1939 the Society entered the field of Secondary Education for Girls and started the Ahilyadevi High School for Girls in the historic premises of the Holkar Wada. The starting of this school was a landmark in the history of girl's education in the Province. H. H. Yashwantrao Holkar, Maharaja of Indore gave a munificent donation of the Holkar Wada and Rs. 25, 000 to start the school. The photograph shows the Holkar Wada-Gadre Wada building before demolition in 1957.



ऐतिहासीक होळकर वाड्यात अहिल्यादेवी मुलींची माध्यमिक शाळा १९३९ साली सुरू करून संस्थेने मुलींसाठी माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्रात प्रवेश केला. या प्रांतातल्या मुलींच्या शिक्षणाच्या इतिहासातील ही एक महत्वाची घटना होती. इंदूर संस्थानचे महाराज यशवंतराव होळकर यांनी यासाठी होळकर वाड्याबरोबरच पंचवीस हजार रूपयांची उदार देणगी दिली. छायाचित्रात सध्याची इमारत उभारण्यापूर्वीच्या होळकर वाड्याचे १९५७ सालातील रूप दिसत आहे.

Shri. Dhondo Keshav Karve started as a Mathematics teacher in the Deccan Education Society's New English School and Fergusson College and after his retirement he devoted himself to the work of educating Hindu widows. The Hindu Widows' Home Association (Later named as Hingane Stree Shikshan Samstha) and the SNDT University owe their existence to Prof. Dhondo Keshav Karve. In recognition of his epoch making work in women upliftment and education, he was conferred BharatRatna: India's most prestigious civil award in 1958 by the Government of India. This photograph shows Maharshi D. K. Karve with Head Mistress Smt. Sindhutai Savarkar of Ahilyadevi Highschool for Girls in the school premises.



श्री. धोंडो केशव कर्वे यांनी आपली कारकीर्द डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन महाविद्यालयातील गणिताचे शिक्षक म्हणून केली. निवृत्तीनंतर त्यांनी स्वत:ला हिंदू विधवांच्या शिक्षणकार्यात झोकून दिले.
हिंदू विडोज होम असोसिएशन –ज्याचे पुढे हिंगणे स्त्री शिक्षण संस्था असे नामकरण झाले आणि श्रीमती ना. दा. ठाकरसी विद्यापीठाचे अस्तित्व प्रा. धोंडो केशव कर्वे यांच्यामुळेच आहे.
स्त्रियांचे शिक्षण व उध्दाराच्या त्यांच्या या युगप्रवर्तक कार्याची पावती, भारत सरकारने १९५८ साली त्यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' या पदवीने गौरवून दिली.
या छायाचित्रात महर्षी धोंडो केशव कर्वे अहिल्यादेवी शाळेच्या प्रांगणात मुख्याध्यापिका श्रीमती सिंधूताई सावरकर यांच्या समवेत दिसत आहेत.

New English School started in 1880 first at Morobadada Wada was once again shifted in 1953. The School which was related to Nana wada Shifted to from Nana Wada to the new building at Tilak Road premises. The inauguration took place at the hands of Dr. S. Radhakrishnan, Vice President of India on 10th January 1954. The Photograph shows from L to R: Prof. G. L. Chandratreya, Prof. P. N. Virkar, Vice President Dr. S. Radhakrishnan and Prof. N. G. Damle. Also prominently displayed is the board of Kusumbai Motichand Planetarium, which has remained a unique and special feature of the school. The second photograph shows the school building in early days from the playground side.






१८८० साली प्रथम मोरोबादादा वाड्यात सुरू केलेल्या न्यू इंग्लिश स्कूल या शाळेचे १९५३ मध्ये पुन्हा एकदा स्थलांतर झाले. १९०९ पासून नाना वाड्यात भरत असलेली ही शाळा आता टिळकरोडच्या सध्याच्या परिसरातील नव्या इमारतीत आली. १० जानेवारी १९५४ रोजी भारताचे उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते नवीन इमारतीचे उद्घाटन झाले. या प्रसंगीच्या छायाचित्रात (डावीकडून): प्रा. गो. ल. चंद्रात्रेय, प्रा. पु. ना. वीरकर, उपराष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन आणि प्रा. न. ग. दामले, शाळेचे वेगळे वैशिष्ट्य असणाऱ्या कुसुमबाई मोतीचंद तारांगणाचा नामफलकही पाठीमागे आहे. शाळेच्या इमारतीचे सुरूवातीच्या काळातले मैदानाच्या बाजूने घेतलेले छायाचित्र शेजारी आहे.

" When we first came in contact with Mahatma Gandhi in 1917 in Bihar, some of us, who had heard about the activities of the great leaders of Maharashtra and particularly of this institution, felt that we might also do something on the same lines; and, as a matter of fact, we decided amongst ourselves, while we were still in Champaran with Gandhiji, to establish a model college on the lines of the Fergusson College of Poona, and I was deputed by those friends who were associated with that undertaking to pay visit to Poona to see this college with my own eyes and to carry such inspiration as I could by coming in contact with friends here."

The first President of free India Dr. Rajendra Prasad visited the Fergusson College on 19th November 1954.

From L to R: Prof S. R. Parasnis, --, Principal D. D. Karve, Dr. Rajendra Prasad (President of India), Morarjibhai Desai (Chief Minister of Bombay), Principal S. V. Kogekar, Prof. V. V. Apte



''१९१७ साली बिहारमध्ये आमचा महात्मा गांधीशी जेव्हा प्रथमच संबंध आला त्यावेळी आमच्यापैकी ज्यांनी महाराष्ट्रातल्या थोर नेत्यांच्या कार्याविषयी आणि विशेषत: या संस्थेविषयी ऐकले होते त्यांना आपणही याच धर्तीवर काही करावे असे वाटले आणि खरोखरच त्याच वेळी आम्ही चंपारण्यामध्ये गांधीजीबरोबर असतानाच आमच्या-आमच्यात फर्ग्युसन महाविद्यालयासारखे आदर्श महाविद्यालय स्थापन करायचे ठरवूनही टाकले. या कल्पनेशी सहमत असलेल्या मित्रांनी माझ्यावर पुण्यास भेट देऊन मी स्वत: हे महाविद्यालय पहावे आणि येथील मित्रांशी संबंध जोडून काही स्फूर्ती घेऊन यावे अशी कामगिरी सोपविली.'' स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी फर्ग्युसन महाविद्यालयास १९ नोव्हेंबर १९५४ रोजी भेट दिली.

यावेळच्या या छायाचित्रात (डावीकडून): प्रा. श्री. रा. पारसनीस, --, प्राचार्य दि. धों. कर्वे, राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद, मुंबई मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाई, प्राचार्य स. वा. कोगेकर, प्रा. व्ही. व्ही. आपटे

A new trend was established with the taking over for management of Hindustan Antibiotics School at Pimpri by the DE Society in 1965. Schools of public undertakings were entrusted to DES for management, with a view to providing quality education, owing to its proficiency and reputation in the field of education. The first photograph shows Shri Lal Bahadur Shastri, Minister of Commerce and Industries, laying the cornerstone of the school building, in May 1958. Second photograph shows Hindustan Antibiotics School, Pimpri being inaugurated at the hands of Pt. Jawaharlal Nehru on 4th June 1960.






सन १९६५ मध्ये पिंपरीचे हिंदुस्थान ॲन्टिबायोटिक्स स्कूल डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या व्यवस्थापनाखाली येण्याने एक नवी पध्दती रूळली. सार्वजनिक उद्योगांच्या शाळा गुणवत्ता पूर्ण शिक्षणासाठी या संस्थेकडे व्यवस्थापनासाठी सोपविल्या जाणे हे संस्थेच्या शिक्षणक्षेत्रात असलेल्या कीर्ती व कौशल्यामुळे घडून आले.

सोबतच्या पहिल्या छायाचित्रात मे १९५८ मध्ये उद्योग व वाणिज्य व्यापार मंत्री श्री लाल बहादूर शास्त्री हिंदुस्थान ॲन्टिबायोटिक्स स्कूलच्या इमारतीची कोनशिला बसविताना दिसत आहेत तर दुसऱ्या छायाचित्रात पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे हस्ते शाळेच्या इमारतीचे ४ जून १९६० रोजी उद्घाटनाचा प्रसंग आहे.

The fourth President
of the Society
Major General His Highness
Sir Shri. Shahaji Chhatrapati,
Maharaja of Kolhapur
1948 to 1984



संस्थेचे चतुर्थ अध्यक्ष
मेजर जनरल हिज हायनेस
सर श्री शहाजी छत्रपती,
कोल्हापूरचे महाराज
१९४८ ते १९८४

# Deccan Education Society Pune

## 1959-1984

The D. E. Society took next logical step of establishing a college in the state capital - the Bombay College at Prabhadevi, Dadar, Mumbai - in 1954. The function to rename the Bombay College as Kirti M. Doongursee College was held on 27th March 1960, when Vice President Dr. S. Radhakrishnan was the Chief Guest. In the photograph are seen arriving for the function from L to R: Principal M. G. Bhate, Dr. S. Radhakrishnan, and Governor Shri Sri Prakasa. Shri Balasaheb Desai, Minister, State of Maharashtra is seen behind.



बॉम्बे कॉलेजच्या रूपाने महाराष्ट्र राज्याच्या राजधानीत महाविद्यालय स्थापन करण्याचे पाऊल १९५४ साली प्रभादेवी, दादर, मुंबई येथे टाकले. या महाविद्यालयाचे पुढे २७ मार्च १९६० रोजी कीर्ती म. डुंगरसी महाविद्यालय असे नामकरण करण्याचा कार्यक्रम झाला. उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. छायाचित्रात कार्यक्रमाचे ठिकाणी येताना डावीकडून : प्राचार्य म. गो. भाटे, उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्, आणि राज्यपाल श्री. श्रीप्रकाश. पाठीमागे नामदार श्री. बाळासाहेब देसाई दिसत आहेत.

In the function to name the Bombay College as Kirti M. Doongursee College, Governor Sri Prakasa speaks. On the dais are seen from L to R: Principal M. G. Bhate, Vice President Dr. S. Radhakrishnan, Shri D. D. Kapadia, Chairman of the Council of the Society. Interestingly the first Principal of Bombay nee Kirti College, Dr. Manohar Govind Bhate is the son of Principal Govind Chimanaji Bhate the first Principal of D. E. Society's Willingdon College, Sangli.



बॉम्बे कॉलेजचे कीर्ती म. डुंगरसी महाविद्यालय असे नामकरण करण्याच्या कार्यक्रमात राज्यपाल श्री श्रीप्रकाश भाषण करीत आहेत.
व्यासपीठावर बसलेले डावीकडून : प्राचार्य म. गो. भाटे, उपराष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन्, संस्थेच्या परिषदेचे अध्यक्ष श्री. डी. डी. कपाडिया. या बॉम्बे उर्फ कीर्ती महाविद्यालयाचे प्रथम प्राचार्य डॉ मनोहर गोविंद भाटे हे संस्थेच्या सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालयाचे प्रथम प्राचार्य गोविंद चिमणाजी भाटे यांचे सुपुत्र हा एक विलक्षण योगायोग आहे.

The Platinum Jubilee of the D. E. Society and Fergusson College-Past Students' Social was celebrated in 1960. In the photograph the past students are seen standing to pay Homage to the Founders. Prominently seen in the first row wearing Pagdi are Mahamahopadhyay Datto Vaman Potdar and Principal Dr. Raghunath Purushottam Paranjapye (first row extreme right)



संस्था व फर्ग्युसन महाविद्यालय यांचा संयुक्त अमृतमहोत्सव १९६० मध्ये साजरा झाला. यावेळी माजी विद्यार्थी संमेलनात माजी विद्यार्थ्यांनी संस्थापकांना उभे राहून आदरांजली अर्पण केली. पहिल्या रांगेत उठून दिसणारे दोन पगडीधारी म्हणजे महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार आणि प्राचार्य डॉ रघुनाथ पुरूषोत्तम परांजपे (पहिली रांग उजवीकडे टोकाला).

President Dr. Rajendra Prasad was the Chief Guest for the Platinum Jubilee celebrations on 12th December 1960.
This photograph with members of Gymkhana Management Committee of Fergusson College
shows from L To R (seated in the front row): Shri S. M. Agashe, Prof G. P. Pradhan, Dr. P. S. Karekar, Sir C. D. Deshmukh, Mrs Deshmukh,
Shri Yashwantrao Chavan (Chief Minister), Principal S. V. Kogekar, Dr. Rajendra Prasad (President of India), Governor Sri Prakasa,
Rajesaheb of Sangli, Mrs. Kogekar, Dr. T. G. Mainkar, Prof V. V. Apte, Mrs. Apte and Prof. P. V. Sovani



राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद अमृत महोत्सवातील प्रमुख पाहुणे होते. माननीय राष्ट्रपतींबरोबरच्या या छायाचित्रात फर्ग्युसन महाविद्यालयाच्या जिमखाना व्यवस्थापन समिती सदस्य डावीकडून
(पुढील रांगेत बसलेले) श्री. एस्. एम्. आगाशे, प्रा. ग. प्र. प्रधान, डॉ. प्र. सुं. कारेकर, सर चिं. द्वा. देशमुख, सौ. देशमुख, मुख्यमंत्री श्री यशवंतराव चव्हाण, प्राचार्य स. वा. कोगेकर,
राष्ट्पती डॉ. राजेंद्रप्रसाद, राज्यपाल श्री श्रीप्रकाश, संस्थेचे उपाध्यक्ष सांगलीचे राजेसाहेब चिंतामणराव पटवर्धन, सौ. कोगेकर, डॉ. टी. जी. माईणकर, प्रा. आपटे, सौ. आपटे, प्रा. प्र. वि. सोवनी.

On the occasion of the 71st birthday of H.H. Raja Chintamanrao Patwardhan, Rajesaheb of Sangli, the Satkar Samiti and Rotary Club came together to sponsor the Commerce College in his name and thus the Chintamanrao College of Commerce was started at Sangli. The college was formally inaugurated at the hands of Vice-President Dr. S. Radhakrishnan on 12th September 1960. The photograph shows from L to R: Smt. M. Iyer, Prin. D. A. Dabholkar, Shrimant H. H. Rani Saheb of Sangli, Dr. S. Radhakrishnan (Vice-President of India), Shrimant H. H. Raje Saheb of Sangli, Prof. G. N. Joshi. In the second photograph Shrimant H. H. Rajesaheb





हिज हायनेस राजा चिंतामणराव पटवर्धन, सांगलीचे राजेसाहेब यांच्या एकाहत्तराव्या वाढदिवसानिमित्तची सत्कार समिती व रोटरी क्लब यांनी एकत्रितपणे व्यापार महाविद्यालय सुरू करण्यासाठी संस्थेला पुरस्कृत केले आणि राजेसाहेबांच्या नावाने चिंतामणराव व्यापार महाविद्यालयाची स्थापना सांगली येथे करण्यात आली. या महाविद्यालयाचे औपचारिक उद्‌घाटन उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे हस्ते १२ सप्टेंबर १९६० या दिवशी झाले. यावेळच्या छायाचित्रात पुढील रांगेत बसलेले (डावीकडून) श्रीमती एम्. अय्यर, प्राचार्य दे. अ. दाभोळकर, श्रीमंत हर हायनेस सांगलीच्या राणीसाहेब, उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्, श्रीमंत हिज हायनेस सांगलीचे राजेसाहेब, प्रा. रा. ना. जोशी, सोबतच्या स्वतंत्र छायाचित्रात माननीय राजेसाहेब.

The new building of the
Chintamanrao College of Commerce, Sangli
was inaugurated at the hands of
Union Defense Minister Shri YashwantraoChavan
on 15th February 1963.



चिंतामणराव व्यापार महाविद्यालाच्या
नवीन इमारतीचे उद्घाटन
केंद्रीय संरक्षणमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते
१५ फेब्रुवारी १९६३ रोजी झाले.

A session of All India Congress Committee was held in 1960 at Pune, when Prime Minister Pt. Jawaharlal Nehru was invited to visit the Fergusson College. Panditji was in a pensive mood after some adverse decision in the session.
The mood is visible even at the tea table. From L to R: Prof D. G. Dhavale, Prime Minister Pandit Nehru, Principal S. V. Kogekar, and Shri. Yashwantrao Chavan (Chief Minister of Maharashtra).



पुण्यात १९६० साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या महासमितीचे अधिवेशन झाले. या निमित्ताने पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना फर्ग्युसन महाविद्यालयाच्या भेटीसाठी बोलाविले होते. कोणत्यातरी मुद्यावर झालेल्या विरूध्द निर्णयामुळे सर्व वेळ पंडितजी विचारमग्न मनस्थितीत होते आणि ही मनस्थिती त्यांच्या चेहऱ्यावर चहापानाच्या वेळीही दिसून येत होती.
छायाचित्रात (डावीकडून) प्रा. दा. गो. ढवळे, पंतप्रधान पंडित नेहरू, प्राचार्य स. वा. कोगेकर, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण.






President Dr. Rajendra Prasad signing in the Visitors' Book at Fergusson College at the time of his second visit to the college on 12th December 1960. Chief Minister of Maharashtra, Hon'ble Shri Yashwantrao Chavan looks on. The signature is in the accompanying photograph.

या छायाचित्रात फर्ग्युसन महाविद्यालयाच्या आपल्या दुसऱ्या भेटीच्यावेळी अभ्यागत नोंदवहीत स्वाक्षरी करीत असताना राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद दिसत आहेत. शेजारी आहेत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण. सोबत स्वाक्षरीचे छायाचित्र.

Shri S. L. Kirloskar, Shri Nandlal Pitti, Principal N. K. Kulkarni and Guruvarya B. G. Jagtap, Chairman of the Council of the Society, in front of Pitti Hall, Brihan Maharashtra College of Commerce, Pune at the time of the inauguration of the hall.




बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या पित्ती सभागृहाच्या प्रवेशद्वारापाशी (डावीकडून) श्री. शंतनुराव ल. किर्लोस्कर, श्री. नंदलाल पित्ती, प्राचार्य न. का. कुलकर्णी आणि गुरूवर्य बा. गं. जगताप (संस्थेच्या परिषदेचे अध्यक्ष)

Visit of Bharat Ratna Maharshi Dhondo Keshav Karve to Fergusson College: Principal D. D. Karve (on the left), and Principal S. V. Kogekar (on the right).



भारतरत्न महर्षि धोंडो केशव कर्वे यांच्या फर्ग्युसन महाविद्यालयाच्या भेटीप्रसंगी डावीकडे प्राचार्य दिनकर धोंडो कर्वे आणि उजवीकडे प्राचार्य स. वा. कोगेकर.

The long-awaited college hostel and gymkhana building could materialize due to munificent donation by Shri. Manoobhai Doongursee. In the photograph he is seen breaking the ground for Kirti College building for hostel and gymkhana in 1966-67.



कीर्ती महाविद्यालयाला बराच काळ प्रतीक्षा असलेली वसतीगृह व जिमखान्याची इमारत बांधणे श्री. मनुभाई डुंगरसींच्या देणगीमुळे शक्य झाले.
या छायाचित्रात श्री. मनुभाई इमारतीसाठी पहिली कुदळ मारताना दिसत आहेत.

The need for a separate library building at Willingdon College was fulfilled with a grant of Rs. 64,000 from the UGC and Rs. 40,000 from the Maharashtra State Government.
The Library Building was declared open at the hands of Mahamahopadhyay D. V. Potdar on 21st December 1961.
In the photograph on the left Principal R. S. Mugali and on the right Mahamahopadhyay D. V. Potdar.




विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रू. ६४,००० तर महाराष्ट्र शासनाच्या रू. ४०,००० अशा अनुदानातून विलिंग्डन महाविद्यालयाच्या स्वतंत्र ग्रंथालयाची इमारत तयार झाली.
या ग्रंथालयाचे उद्घाटन २१ डिसेंबर, १९६१ रोजी महामहोपाध्याय द. वा. पोतदार यांचे हस्ते झाले.
छायाचित्रात डावीकडे प्राचार्य रं. श्री. मुगळी व उजवीकडे महामहोपाध्याय पोतदार.

Fergusson College Gymkhana Managing Committee with the Vice President in 1970 - 71
Front Row seated from L to R: Prof Smt Shubhangi Raykar, Dr. A. S. Nadkarni, Prof B. W. (Bhalba) Kelkar, Prof. D. S. Desai, Prin. V. N. Dhavale, Dr. Gopal Swarup Pathak, Vice President of India, Smt Pathak, Smt Dhavale, Prof. K. M. Agashe, Dr. K. G. Nitsure, Dr. S. M. Parlikar, Dr. S. B. Mujumdar (who later on founded Symbiosis)
Second Row seated from L to R: Prof. G. N. Joglekar, Shri U. V. Vaidya, Miss Jayashri Gadre, Shri S. S. Sabnis, Shri M. G. Patwardhan(PT Director), Shri V. S. Pargaonkar, Prof. D. B. Kulkarni, Prof. A. Y. Joshi, Prof. C. S. Inamdar, Prof. S. S. Chaubal, Prof. A. K. Mahajani



उपराष्ट्रपती डॉ. गोपाळ स्वरूप पाठक यांच्यासमवेत फर्ग्युसन महाविद्यालयाच्या जिमखाना व्यवस्थापन समितीचे १९७०-७१ मध्ये काढलेले हे छायाचित्र.
पुढील रांगेत बसलेले (डावीकडून) प्रा. श्रीमती शुभांगी रायकर, डॉ. ए. एस्. नाडकर्णी, प्रा. बी. डब्ल्यू (भालबा) केळकर, प्रा. दा. सी. देसाई, प्राचार्य वि. ना. ढवळे, उपराष्ट्रपती डॉ. गोपाळ स्वरूप पाठक, श्रीमती. पाठक, श्रीमती ढवळे, प्रा. क. मो. आगाशे, डॉ. के. गो. नित्सुरे, डॉ. स. म. परळीकर, डॉ. शां. ब. मुजुमदार (ज्यांनी नंतर सिम्बायोसिसची स्थापना केली) मागील रांगेत (डावीकडून) प्रा. गं. ना. जोगळेकर, श्री. यू. व्ही. वैद्य, कु. जयश्री गद्रे, श्री. एस्. एस्. सबनीस, श्री. एम्. जी. पटवर्धन (पीटी डायरेक्टर), श्री. वि. शं. पारगावकर, प्रा. दि. भि. कुलकर्णी, प्रा. ए. वाय. जोशी, प्रा. सी. एस्. इनामदार, प्रा. एस्. एस्. चौबळ आणि प्रा. अ. कृ. महाजनी.

Some teachers of New English School, Satara came together to form Guruvarya Devdhar Shikshan Mandal to start Navin Marathi Shala at Satara in 1969. At the wish of this dedicated group the Mandal was dissolved and the school was handed over to the D. E. Society in 1976. Pre-Primary School "Balak Mandir" was soon established.




सातारच्या न्यू इंग्लिश स्कूलचे काही शिक्षक १९६९ मधे एकत्र आले आणि त्यांनी सातारची नवीन मराठी शाळा सुरू करण्यासाठी गुरूवर्य देवधर शिक्षण मंडळाची स्थापना केली.
या सर्वांच्या इच्छेनुरूप मंडळाचे पुढे विसर्जन करून शाळा डे. ए. सोसायटीकडे १९७६ मध्ये हस्तांतरित करण्यात आली. लवकरच येथे बालक मंदिर या नावाने पूर्व प्राथमिक शाळाही सुरू करण्यात आली.

A donation of Rs. 7 lakhs by Padamshree Dr. R. T. Doshi and Shri Sumatilal Shah helped the DE Society to start Institute of Management Development and Research (IMDR) the first management education institute of Pune in 1974. Bhoomipoojan of IMDR took place at the hands of Shri R. S. Vaze, Chairman of the Council of the Society. Director Dr. P. C. Shejvalkar looks on.





Dr. R. T. Doshi



Shri Sumatilal Shah

इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट ॲन्ड रिसर्च या नावाने पुण्यातली पहिली व्यवस्थापन शिक्षण संस्था सुरू करणे संस्थेला शक्य झाले ते पद्मश्री डॉ. आर्. टी. दोशी आणि श्री. सुमतीलाल शहा यांनी दिलेल्या सात लक्ष रूपयांच्या देणगीतून. या छायाचित्रात आय्. एम्. डी. आर्. चे भूमीपूजन प्रसंगी संस्थेच्या परिषदेचे अध्यक्ष श्री. रा. शं. वझे पहिली कुदळ मारताना दिसत आहेत. शेजारी संस्थेचे संचालक डॉ. प्र. चिं. शेजवलकर दिसत आहेत.

Fergusson College completed 90 years in 1975.
The photograph with the guests shows from L to R: Dr. P. S. Karekar, Prin. D. A. Dabholkar (Vice Chancellor of University of Pune), Shri Yashwantrao Chavan (Union Cabinet Minister and Chief Guest), Principal P. L. Gadgil and Shri. Sharad Pawar (State Cabinet Minister)



फर्ग्युसन महाविद्यालयाने १९७५ साली नव्वद वर्षे पूर्ण केली. यावेळी झालेल्या समारंभाच्या वेळचे पाहुण्यांसोबतचे हे छायाचित्र. छायाचित्रात (डावीकडून) डॉ. प्र. सुं. कारेकर, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू व महाविद्यालयाचे माजी प्राचार्य दे. अ. दाभोळकर, परराष्ट्रमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण, प्राचार्य पां. ल. गाडगीळ आणि श्री. शरद पवार (राज्याचे कॅबिनेट मंत्री).

Completion of 90 years of Fergusson College was celebrated under the Presidentship of Namdar Shri Yashwantrao Chavan and Shri Atur Sangtani as Chief Guest on 11th April 1976. On the dais are seen from L to R: Principal P. L. Gadgil, Namdar Shri Yashwantrao Chavan, Principal D. A. Dabholkar, Principal S. V. Kogekar, Dr. P. S. Karekar and Prof. S. S. Bhave



फर्ग्युसन महाविद्यालयाच्या नवती महोत्सवाचा सांगता समारंभ परराष्ट्रमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. अतुर संगतानी यांच्या प्रमुख पाहुणे या नात्याने उपस्थितीत ११ एप्रिल १९७६ रोजी साजरा झाला.
यावेळी व्यासपीठावर आहेत (डावीकडून) प्राचार्य पां. ल. गाडगीळ, नामदार यशवंतराव चव्हाण, प्राचार्य दे. अ. दाभोळकर, प्राचार्य स. वा. कोगेकर, डॉ. प्र. सुं. कारेकर आणि प्रा. स. शि. भावे.

A group photograph of Life Members in 1979

L to R In chairs (1st Row): Prof. N. R. Kulkarni, Dr. V. V. Gokhale, Prof. D. G. Dhavale, Dr. D. D. Karve, Dr. P. V. Bapat, Prof N. G. Damle, Dr. G. S. Mahajani, Prof. M. V. Patwardhan, Prof. S. R. Parasnis, Prof. D. D. Vadekar, Dr. R. N. Dandekar

In Chairs (2nd Row): Prof. V. V. Apte, Prof. D. A. Dabholkar, Dr. V. N. Dhavale, Prof. S. V. Kogekar, Prof. G. L. Chandratreya, Prof. P. N. Virkar, Prof. N. A. Mavlankar, Dr. T. G. Mainkar, Dr. A. R. Kamat, Dr. V. R. Karandikar

Standing 1st Row: Prin P. L. Gadgil, Prin. V. J. Gosavi, Dr. P. S. Karekar, Prin. C. G. Vaidya, Prof. P. V. Sovani, Prin. K. M. Agashe, Dr. G. N. Joshi, Dr. D. N. Gokhale, Dr. P. C. Shejwalkar, Prof. S. S. Bhave, Prof. E. B. Sakhalkar

Standing 2nd Row: Dr. M. G. Dhadphale, Dr. K. V. Apte, Prof. K. R. Chhapkhane, Dr. B. A. Patil, Prof. S. S. Bodas, Prof. D. S. Desai, Dr. V. A. Puntambekar, Dr. G. N. Jogalekar, Dr. M. S. Athavale, Dr. S. P. Pathak



आजीव सदस्यांचे १९७९ मधील समूह छायाचित्र

पहिली रांग (डावीकडून): प्रा. एन्. आर्. कुलकर्णी, डॉ. व्ही. व्ही. गोखले, प्रा. दा. गो. ढवळे, डॉ. दि. धों. कर्वे, डॉ. पु. वि. बापट, प्रा. न. ग. दामले, डॉ. ग. स. महाजनी, प्रा. एम्. व्ही. पटवर्धन, प्रा. एस्. आर्. पारसनीस, प्रा. दे. द. वाडेकर, डॉ. रा. ना. दांडेकर.

दुसरी रांग (डावीकडून): प्रा. व्ही. व्ही. आपटे, प्रा. दे. अ. दाभोळकर, डॉ. व्ही. एन्. ढवळे, प्रा. स. वा. कोगेकर, प्रा. गो. ल. चंद्रात्रेय, प्रा. पी. एन्. वीरकर, प्रा. एन्. ए. मावळंकर, डॉ. टी. जी. माईणकर, डॉ. ए. आर्. कामत, डॉ. वि. रा. करंदीकर

उभी (पहिली रांग): प्राचार्य पां. ल. गाडगीळ, प्राचार्य व्ही. जे. गोसावी, डॉ. प्र. सुं. कारेकर, प्राचार्य चिं. ग. वैद्य, प्रा. प्र. वि. सोवनी, प्राचार्य के. एम्. आगाशे, डॉ. ग. ना. जोशी, डॉ. द. न. गोखले, डॉ. प्र. चिं. शेजवलकर, प्रा. स. शि. भावे, ए. बा. साखळकर

उभी (दुसरी रांग डावीकडून): डॉ. मो. गो. धडफळे, डॉ. के. वा. आपटे, प्रा. कि. रा. छापखाने, डॉ. व. अं. पुणतांबेकर, डॉ. गं. ना. जोगळेकर, डॉ. म. सी. आठवले, डॉ. श. पुं. पाठक.

Centenary of the New English School, the first ever institute started by the founders, was celebrated in 1980.
New English School, Pune,
was started in Morobadada Wada, and then shifted to Nana Wada and thereafter the school was relocated to the present campus on Tilak Road in 1954.
The photographs belong to Nana Wada where the school was located for 45 long years.





न्यू इंग्लिश स्कूल या आपल्या संस्थापकांनी सुरू केलेल्या पहिल्या शाळेने सन १९८० मध्ये शताब्दी साजरी केली.
पुण्यातील ही शाळा (न्यू इंग्लिश स्कूल) प्रथम मोरोबादादा वाड्यात भरत होती तर नंतर या शाळेचे नाना वाड्यात स्थलांतर झाले.
पुढे सन १९५४ मध्ये या शाळेचे पुन्हा एकदा स्थलांतर होऊन सध्याच्या टिळक रोड येथील जागेत ही शाळा आली.
सोबतची छायाचित्रे आहेत नाना वाड्याची, जिथे तब्बल ४५ वर्षे ही शाळा भरत होती.

In the Centenary Celebration function in 1980, the dignitaries on the dais from L to R : Rajmata Shrimati Sumitra Raje Bhosale, Shri Lalchand Hirachand, Prof M. S. Gore, Prof P. V. Bapat, and Shri V. R. Honap(Chairman of Council of the Society).



न्यू इंग्लिश स्कूलच्या शताब्दी समारंभात व्यासपीठावरील मान्यवर आहेत. (डावीकडून): राजमाता श्रीमती सुमित्राराजे भोसले, श्री. लालचंद हिराचंद, प्रा. मा. स. गोरे, प्रा. पु. वि. बापट, आणि श्री. व्ही. आर्. होनप (संस्थेच्या परिषदेचे अध्यक्ष)

The building of the New English School was lit up in festive mood for centenary celebrations in 1980.

The centenary celebrations of the New English School, Tilak Road, Pune were more than mere speeches. Hindustani Classical music recital by Pt. Kumar Gandharva on the occasion made it more memorable.





शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने केलेल्या विद्युतरोषणाईने झगमगणारी ही
न्यू इंग्लिश स्कूलची इमारत-सन १९८०

प्रसिध्द शास्त्रीय संगीत गायक पंडित कुमार गंधर्व यांच्या गायनाने हा महोत्सव फक्त समारंभातल्या भाषणांपलिकडे जाऊन संस्मरणीय ठरला.

Institute of Applied Research and Development in Agriculture (IARDA) Sangli, is a unique example of entry of DES into an area not treaded earlier. The institute was started in 1982. The Wasukaka Joshi Laboratory was soon constructed.
In the photograph from L to R: Dr. Y. S. Toro, Hon Director of IARDA and Dr. B. A. Patil, Principal of Willingdon College explains about the facility to The President of the Society Chhatrapati Shri Shahu Maharaj.



पूर्वी कधीच पाऊल न टाकलेल्या क्षेत्रात पदार्पण असे वर्णन करण्याची घटना म्हणजे संस्थेने सांगलीच्या आपल्या शैक्षणिक परिसरात सुरू केलेली शेतीविषयक शिक्षणसंस्था– इन्स्टिट्यूट ऑफ ॲप्लाईड रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट इन ॲग्रीकल्चर. सन १९८२ मध्ये ही इन्स्टिट्यूट सुरू केल्यानंतर लवकरच 'वासूकाका जोशी प्रयोगशाळेचे बांधकाम पूर्ण करण्यात आले.
या छायाचित्रात डावीकडे पाठमोरे संस्थेचे मानद संचालक डॉ. य. शं. तोरो आणि विलिंग्डन महाविद्यालयाचे प्राचार्य भा. अ. पाटील (उजवीकडचे) संस्थेचे अध्यक्ष छत्रपती श्री. शाहू महाराज यांना या ठिकाणच्या सुविधांबद्दल माहिती देत आहेत.

Visit of the Vice President Mohammad Hidaytullah to the Fergusson College on 1st November 1980.
This photograph at the entrance of the B. J. Wadia Library shows from L to R: Vice President M. Hidaytullah, Dr. P. S. Karekar (Secretary of the Society), Justice Bhalchandra Deshmukh, Principal P. L. Gadgil, Shri G. S. Joshi (Chairman of Council of the Society).



उपराष्ट्रपती मोहमद हिदायतुल्ला यांनी १ नोव्हेंबर १९८० रोजी फर्ग्युसन महाविद्यालयाला भेट दिली. बाई जेरबाई वाडिया ग्रंथालयाच्या प्रवेशद्वारापाशी काढलेल्या यावेळच्या छायाचित्रात आहेत (डावीकडून) : उपराष्ट्रपती मोहमद हिदायतुल्ला, संस्थेचे कार्यवाह डॉ. प्र. सुं. कारेकर, न्यायमूर्ती भालचंद्र देशमुख, प्राचार्य पां. ल. गाडगीळ, आणि संस्थेच्या परिषदेचे अध्यक्ष श्री. गो. स. जोशी.

Following the example of Hindustan Antibiotics Limited School, the Rashtriya Chemicals and Fertilizers (RCF) School at Kurul was handed over for management to D. E. Society in 1981.




हिंदुस्थान अँटिबायोटिक्स स्कूलच्या उदाहरणाची पुनरावृत्ती करत राष्ट्रीय केमिकल्स अॅन्ड फर्टिलायझर्स या सार्वजनिक उद्योगाची कुरूल येथील शाळा १९८१ मध्ये व्यवस्थापनासाठी डे. ए. सोसायटीकडे सोपविण्यात आली.

Head Mistress of the Hindustan Antibiotics Limited School Smt Shakuntala Dhavalikar presents the issue of Shishushakti to Prime Minister Smt Indira Gandhi on 5th September 1982. Smt Dhavalikar was presented the President's Best Teacher Award by the Government of India.



श्रीमती शकुंतला ढवळीकर यांना केंद्र शासनाचा 'उत्कृष्ट शिक्षक राष्ट्रपती पुरस्कार' ५ सप्टेंबर १९८२ रोजी प्रदान करण्यात आला.
यावेळी हिंदुस्थान ॲन्टिबायोटिक्स स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती ढवळीकर शाळेचा वार्षिकांक शिशुशक्तीचा अंक पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना सादर करताना दिसत आहेत.

Kimaya the unique Cultural Centre was constructed by the Society by adding substantially to the donation of Rs. 50,000/- by Padamshri Shri P. L. Deshpande, the famous writer, actor, composer, Fergussonian, fondly called the Favourite Personality of Maharashtra. Kimaya was inaugurated on 10th December 1981 at the hands of noted Economist and famous Marathi Writer Gangadhar Gadgil. On the dais at the inauguration function from L to R: Principal P. L. Gadgil, Shri Gangadhar Gadgil, Padamshri Shri P. L. Deshpande and Prof G. S. Joshi (Chairman of the Council of the Society)




महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाणारे विख्यात विनोदी लेखक, अभिनेते, संगीतकार, फर्ग्युसनचे माजी विद्यार्थी पद्मश्री श्री पु. ल. देशपांडे यांच्या रू. ५० हजारच्या देणगीत संस्थेने मोठी भर घालून फर्ग्युसन महाविद्यालयात 'किमया' या सांस्कृतिक केंद्राची एक वैशिष्ट्यपूर्ण वास्तुरचना उभारली. १० डिसेंबर १९८१ रोजी नामवंत अर्थतज्ञ व ख्यातनाम मराठी साहित्यिक श्री. गंगाधर गाडगीळ यांचे हस्ते 'किमया'चे उद्घाटन झाले. या प्रसंगी व्यासपीठावर (डावीकडून) प्राचार्य पां. ल. गाडगीळ, श्री. गंगाधर गाडगीळ, पद्मश्री पु. ल. देशपांडे आणि प्रा. गो. स. जोशी (संस्थेच्या परिषदेचे अध्यक्ष).

The Centenary year of Fergusson College was inaugurated in a function on Monday, 2nd January 1984 by Hon. Shri V. N. Gadgil.
In the photograph from L to R: Shri V. N. Gadgil(speaking), Principal P. L. Gadgil, Prof. G. S. Joshi, Chairman of Council of the Society, Principal S. V. Kogekar and Principal V. N. Dhavale




फर्ग्युसन महाविद्यालयाच्या शताब्दी वर्षाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम सोमवार दिनांक २ जानेवारी १९८४ रोजी माजी विद्यार्थी व केंद्रीय मंत्री मा. वि. न. गाडगीळ यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. छायाचित्रात (डावीकडून) श्री. वि. न. गाडगीळ (बोलताना), प्राचार्य पां. ल. गाडगीळ, प्रा. गो. स. जोशी (संस्थेच्या परिषदेचे अध्यक्ष) प्राचार्य स. वा. कोगेकर आणि प्राचार्य वि. न. ढवळे.

# Deccan Education Society Pune

1984-2009

The Deccan Education Society Celebrated its Centenary during 1983-84. In the function held on 24th October 1984 on the dais from L to R: Prof. G. S. Joshi, Chairman of the DES Council, Shri P. V. Narsimharao, Union Minister of Home affairs and past student of Fergusson College. Chhatrapati Shri Shahu Maharaj, President of D. E. Society speaks on the occasion.




डेक्कन एज्युकेशन सोसायटीने १९८३–८४ या वर्षी संस्थेचे शताब्दी वर्ष साजरे केले. २४ ऑक्टोबर १९८४ या दिवशी साजऱ्या झालेल्या समारंभात व्यासपीठावर आहेत. (डावीकडून) : प्रा. गो. स. जोशी (संस्थेच्या परिषदेचे अध्यक्ष), केंद्रीय गृहमंत्री व फर्ग्युसन महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. पी. व्ही. नरसिंहराव. त्याचप्रमाणे या प्रसंगी बोलत आहेत संस्थेचे मा. अध्यक्ष छत्रपती श्री. शाहू महाराज.

A section of the audience in the Centenary Celebration Function of the Society. Prominently seen is Dr. R. N. Dandekar, erstwhile Professor of Sanskrit at Fergusson College, Life Member of the D. E. Society and Secretary of the Bhandarkar Oriental Research Institute.



संस्थेच्या शताब्दी महोत्सव कार्यक्रमातील उपस्थित मान्यवर ठळक उपस्थितांत दिसत आहेत.
डॉ. रा. ना. दांडेकर (फर्ग्युसन महाविद्यालयातील संस्कृतचे माजी प्राध्यापक व संस्थेचे माजी कार्यवाह आणि भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थेचे कार्यवाह)

The Centenary of Fergusson College was celebrated over 3 days from 31st December 1984 to 2nd January 1985. Dr. Raja Ramanna, Chairman of the Atomic Energy Commission of India presided over the main centenary function. In the photograph Dr. Ramanna is seen with Chhatrapati Shri Shahu Maharaj, President of the Society.




फर्ग्युसन महाविद्यालयाची शताब्दी ३१ डिसेंबर १९८४ ते २ जानेवारी १९८५ असे तीन दिवस भरगच्च कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. मुख्य कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी अणुउर्जा आयोगाचे अध्यक्ष डॉ. राजा रामण्णा होते. या छायाचित्रात डॉ. राजा रामण्णा (डावीकडील) संस्थेचे मा. अध्यक्ष छत्रपती श्री. शाहू महाराज यांच्या समवेत दिसत आहेत.

This painting of the Main Building of Fergusson College was done in 1984 by internationally acclaimed artist Gopal Deuskar. Initiative by Barrister Vitthalrao Gadgil, Union Minister of Information and Broadcasting and an Ex-Fergussonian, made possible the release of the postage stamp on 2nd January 1985 on the occasion of the centenary of the college, by the Indian Posts and Telegraph Department. The stamp features this painting.




फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीचे हे तैलचित्र आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार श्री. गोपाळ देऊसकर यांनी १९८४ साली केले. केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री व माजी फर्ग्युसोनियन बॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांच्या पुढाकाराने महाविद्यालयाच्या शताब्दी निमित्ताने २ जानेवारी १९८५ रोजी पोस्टाचे विशेष तिकीट भारतीय पोस्ट व तारखात्याने प्रसृत केले. या तिकिटावर मुख्य इमारतीचे हे तैलचित्र झळकले आहे.

Commemorative postage stamp that was released at the time of the centenary of the Fergusson College on 2nd January 1985 at the hands of Shri Jayantrao Tilak and Shri Vitthalrao Gadgil, a past student of the College and Union Minister of State for Communication.




शतक महोत्सवी वर्षाची स्मृती म्हणून २ जानेवारी १९८५ रोजी माजी विद्यार्थी बॅ. विठ्ठलराव गाडगीळ आणि श्री. जयंतराव टिळक यांच्या हस्ते प्रस्तृत झालेल्या पोस्टाच्या तिकिटाचे छायाचित्र.

Prime Minister Shri Rajiv Gandhi fulfilled commitment (to be the Chief Guest for Centenary celebrations) made by his mother the late Prime Minister Smt Indira Gandhi, that the destiny forbade her from fulfilling.
Rajivji was amongst us on 1st June 1985 as the Chief Guest for Centenary Celebration Function.
In the photograph while entering the venue of the function Rajivji is greeted by eminent citizens.
From L to R: Shri Gopal Deuskar, Shri Rahul Bajaj, Shri Damania, Shri Lalit Sangtani and Shri V. M. Limaye (Chairman of the Council of the Society).



शताब्दी समारंभाच्या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून येण्याचे आपले वचन पूर्ण करणे पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना नियतीच्या दुख:द करणीमुळे शक्य झाले नाही. आपल्या स्वर्गवासी मातेचे हे वचन पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांनी पूर्ण केले. १ जून १९८५ रोजी झालेल्या या कार्यक्रमासाठी राजीवजी फर्ग्युसन महाविद्यालयात उपस्थित होते. कार्यक्रमस्थळी प्रवेश करत असलेल्या पंतप्रधानांचे स्वागत मान्यवर नागरिकांनी केले. छायाचित्रात पंतप्रधान राजीव गांधी यांच्या समवेत (डावीकडून): श्री. गोपाळ देऊसकर, श्री. राहुल बजाज, श्री. दमानिया, श्री. ललित संगतानी आणि संस्थेच्या परिषदेचे अध्यक्ष श्री. व्ही. एम्. लिमये.

Prime Minister Rajiv Gandhi, speaking on the occasion.
In the second photograph the special number 'Landmarks' is released by Prime Minister Rajiv Gandhi.
On the dais seated from L to R: Shri V. N. Gadgil, Shri K. P. Rao, Governor of Maharashtra, Shri P. V. Narsimhrao,
Union Minister of Home Affairs and Shri Vasantdada Patil, Chief Minister of Maharashtra.







पहिल्या छायाचित्रात पंतप्रधान राजीव गांधी या प्रसंगी बोलताना दिसत आहेत तर दुसऱ्या छायाचित्रात माननीय पंतप्रधान 'लॅण्डमार्कस्' या विशेष अंकाचे प्रकाशन करताना दिसत आहेत. व्यासपीठावर बसलेले (डावीकडून): श्री. वि. न. गाडगीळ, महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. कोणा प्रभाकरराव, केंद्रीय गृहमंत्री श्री. पी. व्ही. नरसिंहराव आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील.

Coinciding the Centenary DES English and Marathi Medium Pre Primary Schools were started at Pune on non-grant basis in 1985.
In the function on 10th June 1985 on the dais from L to R: Principal Dr. S. V. Bokil, Shri R. V. Limaye, Vice Chairman, Council of the Society, Head Mistress Smt Alka Agate, Dr. V. A. Puntambekar and Shri S. V. Gosavi, Head Master of New English School, Tilak Road, Pune.
In the second photograph, pupils of 1st standard of 1985 batch are seen.
Also with them from L to R: Smt Kalpana Dhalewadikar, Head Mistress Smt Alaka Agate and Smt Urmila Atre.






संस्थेच्या शताब्दीनिमित्त विनाअनुदानित तत्वावर पुण्यात इंग्रजी आणि मराठी माध्यमाची नवीन शाळा १९८५ मध्ये सुरू करण्यात आली.
१० जून १९८५ रोजी झालेल्या औपचारिक उद्‌घाटन प्रसंगी छायाचित्रात (डावीकडून)प्रा. श्री. व्यं. बोकिल (संस्थेचे कार्यवाह) श्री. आर्. व्ही. लिमये (संस्थेच्या परिषदेचे उपाध्यक्ष), मुख्याध्यापिका सौ. अलकाताई आगटे, डॉ. व. अं. पुणतांबेकर (संस्थेचे आजीव सदस्य) आणि श्री. एस्. व्ही. गोसवी (न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोडचे मुख्याध्यापक),
दुसऱ्या छायाचित्रात १९८५च्या बॅचचे पहिलीचे विद्यार्थी त्यांच्या शिक्षिकांसोबत आहेत (डावीकडून) सौ. कल्पना धालेवाडिकर, मुख्याध्यापिका सौ. अलकाताई आगटे व सौ. उर्मिला अत्रे.

Shri V. P. Singh, Finance Minister of India and an Ex-Fergussonian, inaugurated the renovated N. M. Wadia Amphi Theatre on 30th March 1986. In this function the Vice Chancellor of University of Pune Dr. V. G. Bhide conferred the bachelor's degree on Shri V. P. Singh many years after he had graduated.
In the photograph (From L to R):
Shri V. P. Singh, Dr. V. G. Bhide, Vice Chancellor, University of Pune and Principal P. L. Gadgil.




नूतनीकरण केलेल्या एन्. एम्. वाडिया ॲम्फी थिएटरचे उद्‌घाटन ३० मार्च १९८६ रोजी एका कार्यक्रमात माजी फर्ग्युसोनियन आणि केंद्रीय अर्थमंत्री श्री. विश्वनाथप्रतापसिंह यांनी केले.
याच कार्यक्रमात पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वि. ग. भिडे यांनी श्री. वि. प्र. सिंह यांना त्यांनी अनेक वर्षापूर्वी प्राप्त केलेल्या पदवीचे प्रमाणपत्र प्रदान केले.
छायाचित्रात (डावीकडून) :
श्री. वि. प्र. सिंह, डॉ. वि. ग. भिडे आणि प्राचार्य पां. ल. गाडगीळ.

Golden Jubilee of the Technical Institute was celebrated in 1987.
From L to R: Dr. P. C. Shejwalkar, Director of IMDR, Shri Bhausaheb Limaye Chairman of the Council of the Society, Shri Avinash Wardekar, industrialist, Shri Marporia and Dr. M. G. Dhadphale(Secretary of the Society). Shri Sharad Pawar, Leader of opposition, Maharashtra State Legislative Assembly, lights the lamp. Principal Ashok Ingle and Dr. Uday Limaye look on.




टेक्निकल इन्स्टिट्यूट, पुणे या घटकसंस्थेचा सुवर्णमहोत्सव १९८७ मध्ये साजरा करण्यात आला.
छायाचित्रात (डावीकडून) : आय. एम्. डी. आर्. चे संचालक डॉ. प्र. चिं. शेजवलकर, संस्थेच्या परिषदेचे अध्यक्ष श्री. भाऊसाहेब लिमये, उद्योगपती श्री. अविनाश वारदेकर, श्री. मारपोरीया आणि संस्थेचे कार्यवाह डॉ. मो. गो. धडफळे. महाराष्ट्राच्या विधानसभेचे विरोधी पक्षनेते श्री. शरद पवार दीपप्रज्वलन करत आहेत आणि शेजारी प्राचार्य श्री. अशोक इंगळे तसेच डॉ. उदय लिमये.

The Society, in response to the need for an institute providing vocational education,
started the Vocational Guidance and Training Institute in 1987.
In the inauguration function from left to right: Dr. Uday Limaye (Director of the Institute), Shri Bhausaheb Limaye (Chairman of DES Council), Dr. P.C. Shejwalkar (Director, IMDR) and Dr. M. G. Dhadphale (Secretary of the Society).




व्यवसायाभिमुख शिक्षणाची गरज ओळखून संस्थेने १९८५ साली व्होकेशनल गाईडन्स् अॅन्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूटची स्थापना केली.
या इन्स्टिट्यूटच्या उद्‌घाटनाच्या कार्यक्रमात (डावीकडून) : डॉ. उदय लिमये (संचालक), श्री. भाऊसाहेब लिमये (संस्थेच्या परिषदेचे अध्यक्ष),
आय्. एम्. डी. आर्. चे संचालक डॉ. प्र. चिं. शेजवलकर, आणि संस्थेचे कार्यवाह डॉ. मो. गो. धडफळे.

Platinum Jubilee of Dravid High School, Wai was celebrated in 1987.
In the function the Vice President Dr. Shankar Dayal Sharma is seen releasing the souvenir.
Others from L to R: Dr. V. M. Bachal, Shri Shankarrao Jagtap (Chairman of Legislative Council, Maharashtra),
Shri Shankarrao Chavan (Chief Minister, Maharashtra), and Sou. Kusumtai Shankarrao Chavan




वाईच्या द्रविड हायस्कूलचा अमृतमहोत्सव १९८७ मध्ये साजरा करण्यात आला.
छायाचित्रात उपराष्ट्रपती डॉ. शंकरदयाळ शर्मा स्मरणिकेचे प्रकाशन करीत आहेत आणि व्यासपीठावर अन्य (डावीकडून) : मुख्याध्यापिका सौ. कमल माने, डॉ. वि. मा. बाचल,
महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष श्री. शंकरराव जगताप, मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण, आणि सौ. कुसुमताई शंकरराव चव्हाण.

President Gyani Zailsingh visited Fergusson College Campus on 20th November 1988. Also seen are Dr. V. M. Bachal, Principal Dr. S. V. Bokil and Shri R. V. Limaye, Vice Chairman of the Council of the Society.



माननीय राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांनी २० नोव्हेंबर १९८८ रोजी फर्ग्युसन महाविद्यालयास भेट दिली. त्यावेळी मा. राष्ट्रपतींना पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना संस्थेच्या परिषदेचे उपाध्यक्ष श्री. आर्. व्ही. लिमये, मा. राष्ट्रपतींच्या मागे (डावीकडून) डॉ. वि. मा. बाचल आणि प्राचार्य डॉ. श्री. व्यं. बोकील.

Principal D. S. Desai of Kirti M. Doongursee College, Dadar, Mumbai offers best wishes on behalf of the college to his student Sachin Tendulkar for his first New Zealand tour in 1989. Vice Principals Prof. M. S. Athavale and Prof. E. B. Sakhalkar (from L to R) join Principal Desai. Sachin wore the Cap of his country while still studying at Kirti College for his HSC.



न्यूझीलंडच्या आपल्या पहिल्या कसोटी दौऱ्यासाठी सचिन तेंडुलकर १९८९ साली जाणार होता.
आपल्या या बारावीच्या विद्यार्थ्याला या दौऱ्यासाठी कीर्ती एम्. डुंगरसी महाविद्यालयाने एका कार्यक्रमात शुभेच्छा दिल्या. छायाचित्रात प्राचार्य दा. सी. देसाई पुष्पगुच्छ देऊन सचिनचा सत्कार करत आहेत. पाठीमागे बसलेले (डावीकडून) उपप्राचार्य प्रा. म. सि. आठवले व उपप्राचार्य प्रा. ए. बा. साखळकर
कीर्ती महाविद्यालयात शिकत असतानाच सचिनने भारताच्या संघात स्थान मिळविले.

In 1991 the Society received a donation of Rs. 5 Lakhs from the well-known Rathi family (of Sudarshan Chemical Industries, Pune). In appreciation of this donation the Vocational Guidance and Training Institute was renamed Jagannath Rathi Vocational Guidance and Training Institute (JRVGTI). The JRVGTI shifted to its own new building on the Fergusson College Campus in 1993.




सन १९९१ मध्ये संस्थेला प्रसिध्द राठी कुटुंबाकडून (सुदर्शन केमिकल इंडस्ट्रिज, पुणे) ५ लक्ष रूपयांची देणगी मिळाली. याची कृतज्ञता म्हणून व्होकेशनल गाइडन्स ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूटचे नामकरण 'जगन्नाथ राठी व्होकेशनल गाइडन्स ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट' असे करण्यात आले. १९९३ मध्ये इन्स्टिट्यूटने आपले कामकाज फर्ग्युसन महाविद्यालयाच्या आवारातील आपल्या नव्या इमारतीत सुरू केले.

As Willingdon College completed its 75 years, in a step to fulfill the long standing expectations of the citizens of Sangli, the English Medium Pre-Primary and Primary School, Sangli was started in 1994.
In the photograph seen from L to R: Life Members Prof. C. N. Limaye, Dr. S. R. Kulkarni, Prof. A. K. Sapre, and Elected Council Members Shri Balasaheb Limaye, Shri Suryakant Pathak, Shri P. D. Pardeshi, Shri P. D. Gokhale, Prin. Dr. H. S. Nirmale, Prin. Dr. C. G. Vaidya (Secretary of the Society), Shri C. E. Godse (Chairman of DES Council) and Dr. A. P. Bhupatkar (Director, IMDR).




सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयाने १९९४ मध्ये आपली ७५ वर्षे पूर्ण केली.
यानिमित्ताने संस्थेने सांगलीकर नागरिकांची अपेक्षापूर्ति करणारे पाऊल उचलले आणि १९९४ साली इंग्रजी व मराठी माध्यमाच्या पूर्वप्राथमिक व प्राथमिक अशा शाळा सुरू केल्या.
